रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १२६
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, २२ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
कोकण दिंडीचे आळंदीकडे प्रस्थान/२
निवडणूक मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज/५
तायक्कांडो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर/८

## पाकिस्तानमध्ये दहशतवादी हल्ला; ५० जण ठार

**पेशावर** : पाकिस्तानमध्ये पुन्हा दहशतवादी हल्ला झाला असून यामध्ये तब्बल ५० जणांचा मृत्यू, तर २०पेक्षा जास्त जण गंभीर जखमी झाले आहेत. पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वामधील कुर्रम या भागात एका प्रवासी व्हॅनवर हा हल्ला करताना दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. या दहशतवादी हल्ल्यामुळे पाकिस्तानमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. हल्ल्यात जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यातील काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. मृतांच्या संख्येत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. अफगाणिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या आदिवासी भागात जमिनीच्या वादावरून शिया आणि सुन्नी मुस्लिमांमध्ये अनेक दशकांपासून तणाव आहे. दरम्यान, या हल्ल्याची जबाबदारी कोणत्याही गटाने घेतलेली नाही.



# दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या लेखी तसेच प्रात्यक्षिक परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत घेतली जाणार आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे आठ ते दहा दिवस परीक्षा लवकर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य मंडळाचे सचिव देविदास कुल्हाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे अंतिम वेळापत्रकाबाबतची माहिती दिली. या वेळापत्रकानुसार बारावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत, तर दहावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा ३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. परीक्षेचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक २१ नोव्हेंबरपासून राज्य मंडळाच्या http://www.mahasscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाणार आहे.

दरवर्षी बारावीची परीक्षा फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात, दहावीची परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुरू होते. त्यानंतर निकाल मे-जूनमध्ये जाहीर केला जातो. या दरम्यान विविध प्रवेश परीक्षा होतात तसेच नियमित परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठीची पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्टमध्ये होते. या सर्व प्रक्रियेत जाणारा वेळ, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ मिळणे, प्रवेश प्रक्रिया लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने राज्य मंडळाने यंदा बारावी-दहावीच्या परीक्षा आठ ते दहा दिवस लवकर घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार अंतिम वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा ही केवळ माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या तारखांची खात्री करून परीक्षा द्यावी. अन्य संकेतस्थळांवरील किंवा यंत्रणेने छपाई केलेले, व्हॉट्सअ‍ॅप किंवा तत्सम माध्यमातून प्रसिद्ध झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असेही स्पष्ट करण्यात आले.



### अशा आहेत तारखा

**बारावी लेखी परीक्षा :** ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५

**बारावी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा :** २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२५

**दहावी लेखी परीक्षा :** २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५

**दहावी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा :** ३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी

# रायगडात मतदानाचा टक्का वाढला

## एकूण ६९.१५ टक्के नोंद; उद्या निकाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांमध्ये २० नोव्हेंबर रोजी झालेल्या मतदानात ६९.१५ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा दोन टक्क्यांनी, तर या वेळच्या लोकसभा निवडणुकीपेक्षा १० टक्के मतदान वाढले आहे, अशी माहिती रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी गुरुवारी (दि.२१) पत्रकार परिषदेत दिली. त्यांच्यासमवेत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व उपनिवडणूक अधिकारी नितीन वाघमारे उपस्थित होते.



जिल्ह्यात पनवेल, उरण, कर्जत, पेण, अलिबाग, श्रीवर्धन, महाड हे सात विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. जिल्ह्यात २४ लाख ८८ हजार ७८८ मतदार आहेत. त्यापैकी १७ लाख १६ हजार ४०३ मतदारांनी मतदानाचा अधिकार बजावला. ६९.८० टक्के पुरुष मतदारांनी आणि ६८.१२ टक्के महिला मतदारांनी मतदान केले. पनवेल मतदारसंघांत मतदान करण्यात पुरुषांपेक्षा महिलांचे प्रमाण जास्त आहे. तेथे ५८.२८ टक्के पुरुष, तर ५९.१९ टक्के महिलांनी मतदान केले.

अलिबाग मतदारसंघात सर्वात जास्त ७७.१५ टक्के, तर पनवेल मतदारसंघात सर्वात कमी ५८.६३ टक्के मतदान झाले आहे. याशिवाय उरणमध्ये ७६.८०, कर्जत ७५.३०, पेण ७३.०२, महाड ७१.५३ आणि श्रीवर्धनमध्ये ६१.३७ टक्के मतदान झाले. २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीपेक्षा यंदाच्या निवडणुकीत दोन टक्के मतदान वाढले आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत ६७.३३ टक्के मतदान झाले होते, तर याच वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीपेक्षा या विधानसभा निवडणुकीत १० टक्के मतदान वाढले आहे. लोकसभा निवडणुकीत ६०.५१ टक्के मतदान झाले होते.

बाहेरगावी असलेले मतदार मतदानासाठी मोठ्या प्रमाणावर मूळ गावी आल्याने मुंबई-गोवा महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. (पान २ वर..)

### मतमोजणीची तयारी पूर्ण

*२३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी करण्यात येणार आहे. यासाठी प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. ए.आर. काळसेकर पॉलिटेक्निक कॉलेज पनवेल, प्रशासकीय भवन कर्जत, दि.बा. पाटील मंगल कार्यालय जासई-उरण, केईएस लिटिल एंजल स्कूल पेण, जिल्हा क्रीडा संकुल नेहुली-अलिबाग, उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे मतमोजणी केली जाणार आहे.*

# राज्यात वाढलेले मतदान पाहता महायुतीची सत्ता येईल

■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया

**नागपूर : प्रतिनिधी**



मतदानाची टक्केवारी वाढण्यामागे लाडकी बहीण योजनेला मिळालेला प्रतिसाद नाकारता येत नाही. ही वाढलेली मतदानाची टक्केवारी बघता राज्यात त्याचा महायुतीमधील मित्रपक्षांना त्याचा फायदा होईल, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

रात्री उशिरा आलेल्या आकडेवारीनुसार राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी एकूण ६५.११ टक्के मतदान झाले आहे. गेल्या ३० वर्षांमध्ये पहिल्यांदाच राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याचे पहायला मिळाले. याबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नागपुरातच नाही, तर संपूर्ण राज्यात मतदानाची टक्केवारी वाढली आहे. वाढलेल्या टक्केवारीचा नेहमीच भाजपला फायदा झाला असा आजपर्यंतचा अनुभव आहे. २३ नोव्हेंबरला होणाऱ्या मतमोजणीतून आम्हाला किती फायदा होईल हे समोर येणारच आहे. या निवडणुकीत महिलांची टक्केवारी वाढली आहे. अनेक ठिकाणी फोन करून माहिती घेतली. जवळपास २५ ते ३० बूथवर मी चौकशी केली तेव्हा मतदारसंघात टक्केवारी वाढली असल्याचे दिसून आले आहे.

साधारणतः मतदानाची टक्केवारी वाढल्याची कारणे अनेक असली तरी जनतेमध्ये सरकारबद्दल आपुलकी दिसून येत आहे आणि त्याचाच परिणाम ही वाढीव टक्केवारी असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. अद्याप कोणत्याही अपक्षासोबत संपर्क साधलेला नाही तसेच एक्झिट पोलवर प्रवक्ते बोलतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्रिपदाबाबत अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही. निकाल जाहीर झाल्यानंतर आम्ही तिघेही एकत्र बसणार आहोत. पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भावना असल्या तरी त्यावर आता बोलणार नाही. त्याबाबतचा निर्णय निकाल जाहीर झाल्यानंतर घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राहुल गांधी दररोज काही तरी बोलत असतात. त्यामुळे त्यावर दररोज काय बोलायचे, असा टोलाही त्यांनी लगावत भाष्य करणे टाळले.

## निवडक

### लाचप्रकरणी गौतम अदानींवर आरोप; समूहाकडून खंडन

**नवी दिल्ली** : अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेच्या न्यायालयात गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आणि सौर ऊर्जेचे कंत्राट मिळवण्यासाठी भारतीय अधिकाऱ्यांना हजारो कोटी रुपयांची लाच दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर अदानी समूहाकडूनही स्पष्टीकरण देण्यात आले असून आमच्यावर केलेले आरोप निराधार असल्याचे अदानी समूहाच्या प्रवक्त्यांनी म्हटले आहे.

### शाळेचे गेट अंगावर पडून विद्यार्थ्याचा मृत्यू

**कोल्हापूर** : लघुशंकेसाठी जात असताना शाळेचे गेट अंगावर पडल्याने करवीर तालुक्यातील केर्ले येथील कुमार विद्यामंदिर शाळेतील सहावीच्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. स्वरूप दीपकराज माने असे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. ही घटना गुरुवारी (दि. २१) सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची नोंद करवीर पोलिसात झाली आहे. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# कोण निवडून येणार? निकालाबाबत चर्वितचर्वण

**कर्जत : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी मतदान झाले. यामध्ये महायुती, महाविकास आघाडी आणि अपक्ष उमेदवार अशा लढती असून निकालाबाबत चर्चा सुरू झाली आहे. प्रमुख उमेदवारांनी आपापल्या कार्यालयात प्रमुख कार्यकर्त्यांची भेट घेऊन मतदानाचा आढावा घेतला.

किरकोळ घटना वगळता काल मतदान शांततेत पार पडले. काही ठिकाणी खेळीमेळीच्या वातावरणात विविध पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते एकत्र येऊन मतदारांना सहकार्य करताना दिसत होते. चांगले मतदान झाल्यामुळे हे वाढीव मतदान कुणाच्या पारड्यात पडेल याचा अंदाज बांधण्यात प्रमुख कार्यकर्ते गुंतले आहेत. अशात प्रमुख उमेदवारांनी आपल्या कार्यालयात मतदानाचा आढावा घेतला. या वेळी मतदारसंघाच्या सर्वच विभागातील प्रमुख कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती.



मतदान प्रक्रिया बुधवारी झाली. त्यानंतर गुरुवारी सकाळपासूनच कोण निवडून येणार याचा अंदाज बांधणे नाक्या नाक्यावर सुरू झाले. सोशल मीडियावरही मतदार संघात कोण जिंकणार व कोणाला किती मते मिळतील याचा अंदाज मांडला आहे. कुठे कोणता उमेदवार वरचढ आणि कुठे कोणाला फटका बसेल याचा आढावा मांडला जात आहे. असे असले तरी कोण आमदार होणार ते २३ तारखेलाच समजेल.

# एक्स्प्रेस वेवर बोरघाटात टेम्पोची बसला धडक





## तीन जण गंभीर; ११ किरकोळ जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर बोरघाटात कोंबड्या भरलेला टेम्पो ब्रेक फेल होऊन पुढे जाणाऱ्या बसवर आदळला. या अपघातात टेम्पोतील तीन जण गंभीर, तर बसमधील ११ जणांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. जखमींना खोपोली नगर परिषद रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सांगोला ते मुंबई या खासगी बसने (एमएच ०३-सीव्ही-५८५३) एकूण ११ जण मुंबईकडे येत असताना एक्स्प्रेस वेवर बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत कोंबडी वाहतूक करणाऱ्या टेम्पोचा (एमएच १४-एचयू १०६९) ब्रेक फेल होऊन तो पुढे जाणाऱ्या बसला धडकला. त्यामुळे टेम्पोतील शाहिद मोहम्मद, इरफान अयुब खान व कैफ शेख महम्मद इनामदार हे तिघे गंभीर जखमी झाले.

टेम्पोने पाठीमागून येत जोरदार धडक दिल्याने बस एक्स्प्रेस वे सोडून रोडच्या बाजूला २० फूट खड्ड्यात उलटली. या बसमधील चालकासह ११ जण जखमी किरकोळ जखमी झाले. यामध्ये चालक एम. रविचंद्रन, भाऊसाहेब जगन्नाथ कदम, इंद्रजित काशीद, स्मिता माने, आक्काताई मधुकर काशीद, सुभाष काशीद आदींचा समावेश आहे.

जखमींना आयआरबीचे देवदूत पथक, खोपोलीचे अपघात मदत पथक, एचएसपी व खोपोली पोलीस ठाण्याच्या यंत्रणेने सुखरूपणे बाहेर काढून किरकोळ स्वरूपाच्या दुखापती झाल्याने खोपोली नगरपालिका रुग्णालयात उपचार करून सोडण्यात आले, तर टेम्पोमधील तीन गंभीर जखमी व्यक्तींना कामोठे एमजीएम हॉस्पिटल या ठिकाणी रवाना करण्यात आले. या अपघाताबाबत खोपोली पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### बॉर्डर-गावसकर चषक मालिका

# आजपासून भारत वि. ऑस्ट्रेलिया पहिली कसोटी

**पर्थ : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघांमधील बहुप्रतिक्षित बॉर्डर-गावसकर चषक मालिकेला शुक्रवार (दि. २२) पासून पर्थच्या मैदानावर खेळल्या जाणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यापासून सुरुवात होणार आहे. मायदेशातील न्यूझीलंडविरुद्धच्या दारूण पराभवानंतर ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेलेल्या भारतासाठी जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या दृष्टीने ही मालिका खूप महत्त्वाची ठरणार आहे.



भारतीय संघाला डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत जाण्यासाठी ऑस्ट्रेलियाचा किमान ४-० असा पराभव करावा लागेल. त्याचवेळी भारताला घरच्या मैदानावर कडवे आव्हान देण्यासाठी ऑस्ट्रेलिया पूर्णपणे सज्ज आहे. रोहित शर्मा त्याच्या दुसऱ्या बाळाच्या जन्मामुळे पर्थ कसोटीला मुकणार आहे. त्याच्या जागी जसप्रीत बुमराह भारतीय संघाचे नेतृत्त्व करणार आहे. रोहितच्या जागी सलामीला कोण उतरणार यावर सर्वांच्या नजरा आहेत.

बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेतील पहिली कसोटी २२ ते २६ नोव्हेंबरदरम्यान पर्थ येथे, दुसरी कसोटी ६ ते १० डिसेंबर अ‍ॅडलेड, तिसरी कसोटी १४ ते १८ डिसेंबर ब्रिस्बेन, चौथी कसोटी २६ ते ३० डिसेंबर मेलबर्न आणि पाचवी कसोटी ३ ते ७ जानेवारी या कालावधीत सिडनी येथे खेळली जाणार आहे.

भारत वि. ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर लाईव्ह पाहता येणार आहे. याशिवाय चाहत्यांना डिस्ने प्लस हॉटस्टार अ‍ॅपद्वारे या मालिकेच्या लाईव्ह स्ट्रीमिंग पाहता येईल.

**भारतीय संघ** : जसप्रीत बुमराह (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, अभिमन्यू इश्वरन, शुबमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, ऋषभ पंत, सर्फराझ खान, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), आर अश्विन, रवींद्र जडेजा, मोहम्मद सिराज, आकाश दीप, प्रसिध कृष्णा, हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर. राखीव खेळाडू मुकेश कुमार, नवदीप सैनी, यश दयाल

**ऑस्ट्रेलिया संघ** : पॅट कमिन्स (कर्णधार), स्कॉट बोलँड, लेक्स कॅरी (यष्टीरक्षक), जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस (यष्टीरक्षक), उस्मान ख्वाजा, मार्नस लॅबुशेन, नॅथन लियॉन, मिच मार्श, नॅथन मॅकस्वीनी, स्टीव्ह स्मिथ, मिचेल स्टार्क.

## नेरळमध्ये शॉक लागून मुलीचा मृत्यू

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

नेरळमध्ये विजेचा शॉक लागून एका सहा वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. रायमिन रफिक खान (वय ६) असे मयत मुलीचे नाव आहे.

अंध असलेले रफिक खान व त्यांचे कुटुंब नेरळ परिसरात भिक्षा मागून गुजराण करतात. नेहमीप्रमाणे बुधवारी (दि. २०) रात्री पोटाची खळगी भरण्यासाठी निघालेले हे कुटुंब ममदापूर चौकातील टिवाले यांच्या हॉटेलसमोर आले असता रस्त्याच्या कडेला असलेल्या शीतपेयाच्या हातगाडीला रायमिन हिचा हात लागला. त्यामुळे तिला विजेचा झटका बसला. नागरिकांनी तिला रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी या मुलीला तपासून मृत घोषित केले. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

## भाजप नेते अरुणशेठ भगत यंदा वाढदिवस साजरा करणार नाही!



**पनवेल** : भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस शुक्रवारी, २२ नोव्हेंबर रोजी आहे. ते यंदा आपला वाढदिवस साजरा करणार नाहीत.

पनवेल, उरणमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. सर्वपक्षीय नेते पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून येत असतात, परंतु या वर्षी कुणीही शुभेच्छा देण्याकरिता येऊ नये. तुमचे प्रेम व आपुलकी सदैव माझ्यासोबत राहिल, असे अरुणशेठ भगत यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

# पारा घसरला! राज्यात कडाक्याची थंडी

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात थंडीच्या लाटेने जोर धरला आहे. पुण्यातील एनडीए परिसरात राज्यातील सर्वांत कमी १०.८ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये तापमानाचा पारा १२ ते १८ अंशांच्या दरम्यान राहिला आहे. हवामान खात्याच्या मते पुढील काही दिवस तापमानात आणखी घट होण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात थंडीची तीव्रता वाढत आहे. पुण्यातील मगारपट्टा, वडगावशेरी आणि चिंचवड या भागांत अनुक्रमे १८.३, १८.२, आणि १७.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. याशिवाय पुरंदर, इंदापूर आणि नारायणगाव या भागांमध्ये तापमान १३.४, १३.३, आणि १२.९ अंशांच्या दरम्यान राहिले.

हवामान तज्ज्ञांच्या मते, उत्तर भारतातील उच्च दाब क्षेत्र आणि ईशान्येकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांचा परिणाम महाराष्ट्रावर होत असून पुढील आठवडाभर किमान तापमानात घट होण्याचा अंदाज आहे.

जिल्ह्यात बारामती (११.८), आंबेगाव (११.९) या भागांमध्येही थंडीची तीव्रता जाणवत आहे. त्यामुळे शेकोट्या पेटू लागल्या आहेत.

# कार्यकर्ते रमले आकड्यांच्या खेळात

**पाली : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी बुधवारी (ता. २०) संपली, मात्र मतदान झाल्यानंतर आता सर्वांनाच उत्सुकता लागली आहे ती निकालाची. आपलाच उमेदवार कसा निवडून येणार याबाबत सोशल मीडिया व नाक्यावर चर्चांना उधाण आले आहे. सोशल मीडियावर वाकयुद्ध सुरू झालेले दिसत आहे.

निकालाचा दिवस उजाडायला अजून एक दिवस बाकी असल्याने काही कार्यकर्त्यांनी आपल्या दैनंदिन कामाकडे लक्ष दिले आहे. तर काहींनी आराम करण्याचा निर्णय घेतला आहे. तर अनेकजण नाक्यावर बसून मतांची आकडेमोड करीत आहेत.

रायगड जिल्ह्यात सरासरी ६८.८० टक्के मतदान झाले. सातही मतदार संघातील उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत कैद झाले आहे. अनेक उमेदवारांच्या राजकीय प्रतिष्ठा व अस्तित्वाची ही निवडणूक असल्याने दिग्गज उमेदवारांचे भवितव्य ठरविणाऱ्या या निकालाची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. एकूणच प्रचाराचा धुरळा खाली बसला आहे. आणि आता विजयाचा गुलाल उधळण्याची कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली. निवडणूकीची मदार कार्यकर्त्यांवर असते, त्यामुळेच प्रत्येक नेता कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार करतो. विधानसभा निवडणुकीत इतर कार्यकर्त्यांची उमेदवारांची पान हालत नाही.

निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून उमेदवारांनी व पदाधिकाऱ्यांनी प्रचाराचे नियोजन केले आहे. त्यामध्ये कार्यकर्त्यांना अग्रस्थान होते प्रचार फेऱ्या, बैठका, पत्रके वाटणे, मतदारांच्या गाठीभेटी घेणे, छुपा प्रचार करणे या कामांत कार्यकर्ते व्यग्र होते. प्रमुख कार्यकर्त्यांची तर दमछाक झाली. त्यामुळे मतदान झाल्यानंतर त्यांनी निश्वास टाकला आहे. आता त्यांचे लक्ष निकालाकडे लागले आहे. काही कार्यकर्ते पार्टी कार्यालयात जमत आहेत ते आपल्या उमेदवाराला किती मते मिळणार याचा अंदाज घेण्यासाठी आकडेमोड करीत आहेत. काहींनी एक-दोन दिवस आराम करण्याचा निर्धार केला आहे. तर काही जण आपल्या कामाकडे व कुटुंबाकडे लक्ष पुरविणार आहेत.

निखिल खैरे या कार्यकर्त्याने सांगितले की, गेल्या महिनाभर प्रचारासाठी फिरत होतो. त्यामुळे जरा थकलो आहे, मात्र अजूनही आराम नाही सध्या आमच्या उमेदवाराच्या निकालाची उत्सुकता आहे. आमचा उमेदवार निवडून येणार याची खात्री आहे. एकूणच काय तर निकलानंतरच सर्वजण सुटकेचा श्वास सोडणार हे नक्की.

### मतदानानंतर हॉटेल आणि ढाब्यावर गर्दी

निवडणूक मतदान प्रक्रिया संपल्यावर बहुतांश कार्यकर्त्यांनी रात्री हॉटेल व ढाब्यावर गर्दी केली होती. महामार्गांवरील हॉटेल व ढाबे रात्री फुल्ल होते. शिवाय गाव खेड्यातील छोटे मोठे हॉटेल देखील कार्यकर्त्यांच्या गर्दीने भरली होती. यामुळे हॉटेल व ढाबे वाल्यांचा धंदा चांगला झाला. परतीचे मतदारदेखील काही प्रमाणात येथे थांबले होते.

**आम्ही अहोरात्र प्रचार केला आहे. खूप प्रामाणिकपणे मेहनत घेतली आहे. आता निकालाची प्रतीक्षा आहे, परंतु आमच्या उमेदवाराने केलेल्या विकासकामांमुळे यश मिळेल असा विश्वास वाटतो. निकालाची उत्सुकता कायम आहे.**

–सुशील शिंदे, भाजप, पाली शहरप्रमुख

**सोशल मीडियावर मतदार संघात कोण जिंकणार व कोणाला किती मत मिळतील याचा अंदाज मांडला आहे. कुठे कोणता उमेदवार वरचढ आहे. कुठे कोणाला फटका बसेल याचा एकूण आढावा घेऊन मांडले आहे. अनेकांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत.**

–निलेश शिर्के, नागरिक, पाली

## मतदान झाल्यावर रंगले पार्ट्यांचे बेत

### मासळी बाजारात व हॉटेल्समध्ये गर्दी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मतदानासाठी मिळालेली बोनस सुट्टी... त्यात बुधवारचा दिवस म्हणजे मासे खाणाऱ्यांसाठी पर्वणीच. त्यामुळेच आज मतदानाचा हक्क बजावल्यानंतर अनेकांची पावले आपल्या स्थानिक मासळी बाजाराकडे वळली. मासळी बाजारात गर्दी केल्याचे चित्र होते. यासोबतच हॉटेलमध्येही गर्दी दिसून आली.

सकाळीच्या पहिल्या टप्प्यात आपला मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले, पण त्याशिवाय मासळीचा बेत करून दिवसभराची सुटीही मार्गी लागली. फारसे गिऱ्हाईक येणार नाही, असा अंदाज लावत कोळीणींनी बेताचीच मासळी आणली होती, मात्र अचानक आलेल्या ग्राहकांमुळे मासळी खपल्याचे मासळीविक्रेत्या विनाबाई पाटील यांनी सांगितले.



**सकाळीच मतदानाचे कर्तव्य पार पडल्याने दिवसभर काय करायचे, असा प्रश्न होता. त्यामुळे मतदान केंद्राच्या जवळच असलेल्या मासळी बाजारात मासे खरेदीसाठी आलोय.**

**–प्रवीण घरत, मतदार**

# महाड विधानसभा मतदारसंघामध्ये विजयाचे मताधिक्य तीन ते चार हजारांचे!

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड विधानसभा मतदारसंघामध्ये तीन वेळा बिगर काँग्रेसी उमेदवाराला आमदारकी आणि चौथ्यावेळी काँग्रेसी विचारांच्या उमेदवाराला संधी देण्याचा प्रघात असताना परिवर्तन घडविणाऱ्या उमेदवाराचे मताधिक्य केवळ तीन ते चार हजारांच्या दरम्यान असल्याचे दिसून येत आहे.

परिवर्तनाच्या संकेतामध्ये पहिल्यांदा मताधिक्य मिळविता आले नसल्याचा तर दुसऱ्यावेळी मताधिक्य मिळविल्याचा संकेत मतदार जनतेकडून दिला जात असल्याचे दिसून येत असले तरी विधानसभा निवडणुकीमध्ये लोकसभा निवडणुकीतील मताधिक्यापेक्षाही अधिक मताधिक्य मिळत असल्याचे आतापर्यंतची आकडेवारी सांगत आहे. २० नोव्हेंबरला झालेल्या मतदान प्रक्रियेवेळी १९४-महाड विधानसभा मतदार संघाची आकडेवारी आतापर्यंतच्या मतदानाच्या टक्केवारीपेक्षा सर्वाधिक असल्याचे दिसून आले. यामुळे वाढलेले मतदान कोणाच्या गळयात विजयाची माळ घालणार हे मतमोजणीवेळीच स्पष्ट होणार आहे.



महाड विधानसभा मतदारसंघांमध्ये १८ ते १९ वयोगटातील लोकसंख्या १३ हजार ७१७ या वयोगटामध्ये ४ हजार ६४५ मतदार आहेत. २० ते २९ वयोगटातील लोकसंख्या ७५ हजार २३६ असून यापैकी ५३ हजार २२७ मतदारांची नोंदणी झाली आहे. ३० ते ३९ वयोगटातील लोकसंख्या ७१ हजार ९५६ असून या वयोगटातील मतदारांची संख्या ६१ हजार २९३ आहे. ४० ते ४९ वयोगटातील लोकसंख्य ५८ हजार २८६ असून या वयोगटात ५७ हजार ८१५ मतदारांची नोंदणी झाली आहे. ५० ते ५९ वयोगटातील लोकसंख्या ४० हजार २८ असून मतदार संख्या मात्र ४६,४३१ असल्याचे २०२४ च्या अंतिम मतदार यादीमध्ये दिसून येत आहे. ६० ते ६९ वयोगटातील लोकसंख्या २७ हजार ४२६ असून २०२४ च्या अंतिम मतदार यादीमध्ये या वयोगटातील ३८ हजार ११७ मतदारांची नोंद दिसून येते. ७० ते ७९ वयोगटातील लोकसंख्या १६ हजार ५६० असून २१ हजार ६६१ मतदार संख्या दिसून येते. ८० वर्षावरील लोकसंख्या ६ हजार ५३६ असून अंतिम मतदार यादी मध्ये १३ हजार ५९५ अशी या वयोगटातील मतदारांची नोंद आहे.

एकूणच महाड विधानसभा मतदारसंघांमध्ये १८ वर्षावरील ३ लाख १३ हजार ७४५ लोकसंख्या असताना दोन लाख ९६ हजार ३८८ मतदारांची नोंद २०२४ च्या सुधारित अंतिम मतदार यादीत आहे. वयोगटानुसार मतदारांच्या संख्येमुळे मतदारांच्या पसंतीचे उमेदवार कोणत्या वयोगटातील असतील अथवा कोणत्या वयोगटातील मतदारांना कोणत्या वयोगटाचे उमेदवार नकोसे असतील, याचा अंदाज बांधता येतो.

## कर्जतमधून कोकण दिंडीचे आळंदीकडे प्रस्थान



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातून दरवर्षी कोकण दिंडीचे आयोजन केले जाते. यंदा विधान सभेचे मतदान असल्याने आळंदीकडे जाणारी कोंकण दिंडी एक-दोन दिवस उशिरा निघाली. मतदानाचे कर्तव्य बजावून ही दिंडी आज सकाळी निघाली आणि पळसदरी मार्गे आळंदीकडे मार्गस्थ झाली.

ह.भ.प. मारुती महाराज राणे यांच्या मार्गदर्शनाखाली कोंकण दिंडी हलविली येथून निघाली. यामध्ये प्रामुख्याने ह.भ.प. दिलीप महाराज राणे, लक्ष्मण ठाकरे, अनंत बोराडे आदींचा सहभाग आहे. या दिंडीचे आगमन छत्रपती शिवाजी महाराज स्मारका जवळ आल्यानंतर तेथे दत्तात्रेय म्हसे, संतोष वैद्य, शिवाजी भासे, वनिता म्हसे, मनीषा सुर्वे आदींनी स्वागत केले.

या वेळी प्रभाकर बडेकर आदी उपस्थित होते. त्यानंतर ही कोंकण दिंडी बाजार पेठेतून लोकमान्य टिळक चौकात आली. तेथे श्री कपलेश्वराचे दर्शन घेतले. या वेळी अमोल देशमुख, रामभाऊ वाघमारे आदी उपस्थित होते.

प्रत्येक वर्षी श्री कपालेश्वर देवस्थान समितीच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांना नाश्ता व चहा दिला जातो. ही परंपरा गेल्या पंचवीस वर्षांपासून आहे. मात्र यंदा ती प्रथा बंद करण्यात आल्याने वारकरी वर्गाने नाराजी व्यक्त केली. या दिंडीतील वारकऱ्यांना काही सामाजिक कार्यकर्त्यांनी चहापान व नाश्ता दिला. त्यानंतर या दिंडी मध्ये कशेळे, वांगणी, अंबरनाथ आदी परिसरातून आलेल्या दिंड्या सहभागी झाल्या आणि ही दिंडी पळसदरी मार्गे आळंदीकडे मार्गस्थ झाली.

## जिल्ह्यातील डिफेन्स पेन्शनधारकांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हयातील सर्व माजी सैनिक/विधवा/अवलंबीत जे डिफेन्स पेंशन धारक आहेत आणि ज्यांची पेंशन स्पर्श पोर्टल मध्ये स्थलांतर झालेली नाही अशा माजी सैनिक/विधवा/अवलंबीतांनी कार्यालयीन दिवशी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड-अलिबाग येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पोलादपूर, महाड व माणगांव तालुक्यातील माजी सैनिक/ विधवा/ अवलंबीत यांनी आव्हान करण्यात येत आहे की, जे माजी सैनिक/विधवा/अवलंबीत डिफेन्स पेंशन धारक आहेत ज्यांची पेंशन स्पर्श पोर्टल मध्ये स्थलांतर झालेली नाही अशा माजी सैनिक/विधवा/अवलंबीतांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड अलिबाग कार्यालयाचे प्रतिनिधी खाली दिलेल्या दिवशी तालुक्यांना भेटी देणार आहेत.

यामध्ये तालुका माणगांव २ डिसेंबर २०२४ (सोमवार) दौऱ्याचे ठिकाण-माणगांव तहसीलदार कार्यालय व माजी सैनिक संघटना कार्यालय, माणगांव, पोलादपूर ३ डिसेंबर २०२४ (मंगळवार) ते ५ डिसेंबर २०२४ (गुरुवार) दौऱ्याचे ठिकाण - पोलादपूर कचेरी कार्यालय, तालुका -महाड- ६ डिसेंबर २०२४ (शुक्रवार) ते ७ डिसेंबर २०२४ (शनिवार) दौऱ्याचे ठिकाण-सैनिकी विश्रामगृह महाड नवेनगर यांचा समावेश आहे.

मूळ ओळखपत्र व त्याची छायांकीत प्रत, मूळ पीपीओ व त्याची छायांकीत प्रत, डिस्चार्ज बूक व छायांकीत प्रत४) आधार कार्ड व पॅन कार्ड छायांकीत प्रत, बँक पासबूक व छायांकीत प्रत, मोबाईल नंबर ही आवश्यक ती कागदपत्रे लागतील.

माजी सैनिक/विधवा/अवलंबीत डिफेन्स पेंशन धारक आहेत ज्यांची पेंशन स्पर्श पोर्टलमध्ये स्थलांतर झालेली नाहीत त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ले.कर्नल वैजनाथ माने,(नि.) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड अलिबाग यांनी केले आहे.

## निवडणूक खर्चाच्या तपासणीची तिसरी बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघ १८८ निवडणूक २०२४ अंतर्गत सर्व उमेदवारांनी निवडणुकीच्या प्रचार व इतर बाबींसाठी केलेल्या खर्चाची तपासणी करण्यासाठीची तिसरी बैठक खर्च निरीक्षक रमेश कुमार (आयआरएस) यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि.१९) पनवेल महानगरपालिका, सभागृह, २ रा मजला पनवेल, रायगड येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक, नोडल अधिकारी (खर्च) मंगेश गावडे व निलेश नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली खर्च पथक प्रमुख संग्राम व्होरकाटे, सहाय्यक खर्च निरीक्षक संजय आपटे, सहाय्यक खर्च निरीक्षक विजय फासे व खर्च सनियंत्रण पथकातील सर्व सदस्य उपस्थित होते.

या बैठकीला सर्व १३ उमेदवार खर्च प्रतिनिधी उपस्थित होते. प्रशासनाने केलेली व्यवस्था आणि उमेदवार खर्च प्रतिनिधींनी केलेल्या सहकार्यामुळे ही तपासणी सुरळीत झाली.

## नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी बुधवारी (दि.२०) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३२ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून ३७ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

## वशेणी येथे रविवारी महिलांसाठी स्त्री रोग निदान आरोग्य शिबिर



**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

वशेणी येथील रवी किरण हॉस्पिटल, उरण मॅग्नस हॉस्पिटल उलवे आणि इतिहास संपादकीय मंडळ वशेणी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२४) वशेणी दादर कडापे रोड, पोलीसचौकी जवळ असलेल्या रवी किरण हॉस्पिटल येथे सकाळी दहा वाजता मोफत स्त्रीरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात स्त्री रोग तज्ञांकडून मोफत पीएपी, एसएमइए आर तपासणी तसेच गर्भाशय आरोग्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी रविकिरण हॉस्पिटल (९८२१२६६६७०) मच्छिंद्र म्हात्रे (९८१९६५२९५१) संतोष पाटील (९९२०७२४४५७) बी.जे. म्हात्रे (९७६९२७५००३) गणेश खोत (८०९७३५८७८८) ए.बी. तांडेल (९९२०३४५०३६) संदेश गावंड (९६५७८६५८८४) यांच्याशी संपर्क साधा, असे आवाहन मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले आहे.

पान १ वरुन

## रायगडात मतदानाचा टक्का वाढला

त्यामुळे महामार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक काही काळ थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला होता, असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.

२३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी करण्यात येणार आहे. मतमोजणीसाठी दोन हजार ४५३ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १८१ मतमोजणी पर्यवेक्षक, २०४ मतमोजणी सहाय्यक, १६५ मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक, १८३ इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२), ९८६ इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३), ७३४ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

मतमोजणीसाठी सर्व केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मतदानकेंद्रांवर त्रिस्तरीय बंदोबस्त असेल. पहिल्या टप्प्यात निमलष्कारी दल, दुसऱ्या टप्प्यात राज्य राखीव पोलीस दल, तिसऱ्या टप्प्यात स्थानिक पोलीस दल असा बंदोबस्त असेल. सर्व टप्प्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त सर्व मतमोजणी केंद्रावर १०० पोलीस कर्मचारी व १० पोलीस अधिकारी असा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

## मांजराच्या पिल्लांना जीवदान

**उरण : वार्ताहर**

मुकेश विष्णू पाटील यांनी उलवे साई मंदिराजवळ असलेल्या IGBK BALAJI CRUSHER PLANT प्लांटमध्ये एक मांजरीचे पिल्लू क्रशर प्लांटच्या तोडलेल्या दगडांमध्ये अडकले आहे आणि ते पिल्लू घरात पाळली जाणाऱ्या मांजरीच्या पिल्लापेक्षा थोडं वेगळं दिसत आहे, असे नेचर फ्रेण्ड सोसायटी (NFS) पनवेल या संस्थेचे अध्यक्ष संतोष उदरे यांना कळविले.

उदरे यांनी उरण वनपरिमंडळाचे आरएफओ विष्णू कोकारे यांना कळविले सहकारी शार्दूल वारंगे, उरण वनपरिमंडळाचे भाऊसाहेब संजय पाटीलही घटनास्थळी पोहचले. या वेळी जंगल मांजरीची तीन पिल्ले दगडखाणीमध्ये मध्यभागी अडकलेली दिसली. ती पिल्ले दोन तीन दिवसांपासून तिथे अडकली आहेत आणि ओरडत आहेत, म्हणून कामगारांनी दोन तीन दिवसांपासून तेथील दगड तोडण्याचे काम बंद ठेवले आहे.

मोठ्या शर्तीने व दोन तासांच्या अथक प्रयत्नाने त्या तीन पिल्लांची यशस्वी सुटका करण्यात आली. या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये भाऊसाहेब संजय पाटील, NFS संस्थेचे अध्यक्ष संतोष उदरे व NFS संस्थेचे शार्दूल वारंगे यांनी महत्वाची भूमिका पार पाडली.



## मतदान केंद्रावर नवमतदारांचा उत्साह



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सहा विधानसभेत झालेल्या मतदानाच्या दिवशी युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. मतदान कसे असते, उमेदवार निवडून आणण्याचा हक्क कसा असतो, याचा अनुभव पहिल्यांदाच लोकशाही उत्सवात सहभाग घेताना मतदान केंद्रावर दिसून आले.

मतदान केल्यानंतर केंद्राबाहेर आल्यावर आनंद निर्माण झाल्याचे तरुणांमध्ये पाहवयास मिळाले. सेल्फी, छायाचित्र काढून आम्ही लोकशाही उत्सवात सहभागी झालो, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. युवक, युवतींनी समाजमाध्यमांवर आपले छायाचित्र टाकले. देश, राज्य आणि आपला मतदारसंघ विकासाच्या दृष्टीने तरुणाईने मतदान केले.

**मतदानाचा हा पहिलाच अनुभव होता. केंद्रावर जाऊन मतदान केले. खूप छान वाटले. निवडणुकीत आपल्या परिसराचा विकास करेल, अशा उमेदवाराला निवडून देण्यासाठी आई-वडिलांसोबत मतदान केले. पुढच्या निवडणुकीतही मतदानाचा हक्क बजावणार.**

**–राशी नीलेश वाळींजकार, युवती, नवमतदार**

**मतदानाबाबत कुतूहल होते. पहिल्यांदा मतदान केले. विकासाच्या दृष्टीने आपले मतदान हेदेखील बहुमूल्य आहे. येणाऱ्या सरकारने तरुणांसाठी नोकरी, व्यवसायासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ज्या सरकारी शाळा अद्ययावत कराव्यात, आर्थिक दुर्बल घटकाला लाभ घेता येईल असे रुग्णालय उभारावे, अशी माफक अपेक्षा आहे. मतदान करून केंद्राबाहेर आल्यावर खूप आनंद झाला.**

**–तौफिक शेख, युवक नवमतदार**

**घरातील सदस्य, नातेवाईक हे प्रत्येक निवडणुकीत मतदान करतात. मलाही हा अनुभव घ्यायचा होता. माझे मतदान ओळखपत्रात नाव आल्यावर आनंद झाला. केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला याचा आनंद होत आहे.**

**–कार्तिक परदेशी, युवक नवमतदार**

**लोकसभा, महापालिका व अन्य निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी लोक केंद्रांवर जात असायचे. मलाही मतदान करायचे होते. १८ वर्षे पूर्ण होताच मतदान ओळखपत्र तयार केले आणि पहिलेच मत हे विधानसभा निवडणुकीसाठी दिले आहे. मतदान केल्याचा आनंद झाला.**

**–विघ्नेश गणेश पै, युवक नवमतदार**

**आपल्या मतदारसंघातील उमेदवार हा विधानसभेत जावा आणि विकासाच्या योजना आणाव्यात, यासाठी आपले मतदान हे खूप महत्त्वाचे असते, याची जाण आहे. विधानसभेसाठी पहिल्यांदा मतदान केले. त्यामुळे आनंद झाला. खरेतर प्रत्येक मतदारांनी लोकशाही उत्सवात सहभागी झाले पाहिजे.**

**–राज सुरेंद्र राऊत, युवक नवमतदार**

# उरणमध्ये तापमानाचा पारा घसरला

## गुलाबी थंडीत नागरिक लुटताहेत शेकोट्यांचा आनंद

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात नोव्हेंबर महिन्यात पारा घसरू लागल्याने रात्रीच्या व पहाटेच्या वेळी ठिकठिकाणी शेकोट्या पेटवण सुरू झाले आहे.

गुलाबी थंडीचे रूपांतर बोचऱ्या थंडीमध्ये झाल्यावर नागरिकांना हुडहुडी भरली जाते, हिवाळ्याच्या दिवसात सकाळी सकाळी पडणारे दाट धुके आणि बोचणारी थंडी सर्वांना हवीहवीशी वाटते. या थंडी बरोबर उबदार कपडे आणि चौकातून, घराबाहेर, घरांच्या कोपऱ्यांवर उब देण्यासाठी केलेल्या शेकोट्या आणि त्यांच्या भोवती गोलाकार बसून शेकोटीचा आनंद घेत असलेले नागरिक हे चित्र उरण परिसरातील ग्रामीण भागात काही दिवसांपासून दिसू लागले आहे.



गेल्या काही दिवसांपासून उरण परिसरात गारवा वाढत असल्याने अनेक ठिकाणी शेकोट्या पेटताना दिसू लागल्या आहेत. अडगळीतील लाकडे, पालापाचोळा, पेंढा, सुकलेले इत्यादींचा वापर करून या शेकोट्या केल्या जातात. उरण परिसरात मोठया प्रमाणावर ग्रामीण भाग असल्याने येथे लाकूडफाटा देखील मुबलक आहे त्यामुळे हिवाळ्यासाठी खास मोठे लाकूड, ओंडके शेकोटीकरिता ठेवले जात आहेत. त्यामुळे घराच्या अंगणात परसदारी दररोज हा लाकूडफाटा पेटवून शेकोटी केली जाते. लहान मुले, स्त्री-पुरुष, वृद्ध, तरुण सर्वजण या शेकोट्यांचा आनंद घेतात.

उरण शहरात सार्वजनिक ठिकाणी, चौकात आवर्जून शेकोट्या केल्या जात असल्याचे चित्रंही पहायला मिळत आहे. सकाळी अगदी नऊच्या सुमारास सूर्याची किरणे जाणवेपर्यंत शेकोटीचा आनंद नागरिकांच्या माध्यमातून घेतला जात आहे. हिवाळा आणि शेकोटी हा नागरिकांच्या मनोरंजनासाठी अविभाज्य घटक बनला आहे, या शेकोटी भोवती बसून जुन्या गप्पा, भुताखेताच्या गोष्टी, गाणी, विनोद आणि मनोरंजनाची वेगळी अशी पर्वणी यानिमित्ताने नागरिकांना मिळत आहे.

उरण परिसरात शेकोटीला तापोटी असेही संबोधतात. काहीजण या शेकोटीमध्ये मका भाजणे, रताळी भाजणे असा प्रकार करून या पदार्थांचा आस्वाद घेत शेकोटीचा आनंद लुटत आहेत. पूर्वी आंब्याच्या आतील बाठा सुकवुन त्यातील कोय (आंब्याचे बी) देखील भाजली जात होती. एरवी जिभेला कडू लागलेला आंब्यातील कोय भाजल्यावर त्याची गोड तुरट अशी चव लागते त्यामुळे आजही काहीजण याचा वापर शेकोटी पेटवताना याचा वापर करत आहेत, मात्र त्याचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत कमी झाले आहे.

# खर्च नियंत्रण कक्षास भेट देऊन निरीक्षकांनी घेतला आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मतदानाच्या नंतर निवडणूक आयोगास सादर करावयाच्या अहवालाकरिता खर्च निरीक्षक रमेश कुमार(आयआरआस) यांनी गुरुवारी (दि.२१) पनवेल, कर्जत, उरण, पेण या विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक खर्च निरीक्षक यांची आढावा बैठक पनवेल महापालिका मुख्यालयात घेतली.

या वेळी अतिरीक्त आयुक्त तथा नोडल अधिकारी आचारसंहिता कक्ष भारत राठोड, खर्च संनियंत्रण समिती नोडल अधिकारी (खर्च) मंगेश गावडे व निलेश नलावडे, खर्च लेखा पथक प्रमुख संग्राम व्होरकाटे, सहाय्यक खर्च निरीक्षक विजय फासे, संजय आपटे, चंद्रशेखर खामकर, ब्रजेशकुमार, प्रशांत येडे, सुभाष पवार व खर्च सनियंत्रण पथकातील सर्व सदस्य उपस्थित होते.

आढावा बैठकीत निवडणूक कालावधीतील उमेदवारांचा निवडणूक खर्च, जप्त केलेल्या रोख रक्कम, अंमली पदार्थ, मद्य, मौल्यवान धातू इत्यादी जप्तीबाबत सविस्तर माहिती घेतली.

आगामी कालावधीत चारही मतदार संघातील निवडणुकीमध्ये सहभाग घेतलेल्या सर्व उमेदवारांचे निवडणूक लेखे अंतिम करण्याबाबत खर्च निरीक्षकांनी सूचना व मार्गदर्शन केले.



# ‘सीकेटी’च्या सुभाष मानकर यांना वोकेशनल एक्सलन्स ॲवॉर्ड




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर यांचा २०२४ -२५ चा वोकेशनल एक्सलन्स अवॉर्ड चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांना देण्यात आला.

कार्यक्रमाच्या वेळी रोटरी क्लब व पनवेलचे अध्यक्ष अरुण खेडवाल, उपाध्यक्ष पुरणसिंग मेहरा आणि रोटरी क्लबचे रायगड जिल्हा डिस्ट्रिक्ट गव्हर्नर शितल शहा आदी मान्यवर उपस्थित होते. सुभाष मानकर हे २७ वर्षे सीकेटी विद्यालयामध्ये शिक्षक आणि मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार रोटरी क्लब पनवेल महानगर यांच्या वतीने देण्यात आला.

संस्थेचे कार्याध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय.टी.देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर तसेच सचिव डॉ. एस.टी.गडदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.



**पनवेल : पालघर जिल्ह्यातील गावराईपाडा वसई येथील मंगळ्या पाटील परिवार श्री खंडोबा ट्रस्ट-गावराईपाडा यांच्या कुलदैवत श्रीखंडोबा मंदिराचे उद्घाटन आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा ५ ते ७ डिसेंबरदरम्यान होणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण ट्रस्टच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन देण्यात आले. या वेळी मंगळ्या पाटील परिवार श्री खंडोबा ट्रस्टच्या वतीने पंचमहाभूत मर्चन्ट नेवी ऑफिसर गणेश बाळकृष्ण पाटील, योगेश पाटील, नरेंद्र पाटील, कुंदन पाटील, अक्षय पाटील, दिपतेश पाटील, लक्ष्मण पाटील, प्रथमेश म्हात्रे, संकेत पाटील, रोहिदास पाटील, वसंत पाटील, चिराग पाटील, कौस्तुभ पाटील, धनंजय पाटील आदी उपस्थित होते.**

# मतदान जनजागृतीवेळी अपघात झालेल्या व्यक्तीवर शस्त्रक्रिया

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्त्याला मतदान जनजागृतीवेळी एका दुचाकीस्वाराने उडविले. यात त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली. ही बाब आमदार प्रशांत ठाकूर यांना समजताच त्यांनी उपचारासाठी आर्थिक सहकार्य केले.

अजय प्रताप सिंह या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्याला मतदानाच्या दोन दिवस आधी मतदान जनजागृती करताना रस्त्यावर एका दुचाकीस्वाराने उडविले. यात ते गंभीररित्या जखमी झाले. त्यांच्या पायाला दुखापत झाली. त्यांना तत्काळ मेडिसिटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. अजय प्रताप सिंह यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याची बाब काही नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना खारघरच्या सेंट्रल पार्कमध्ये झालेल्या संवादावेळी सांगितली. त्यांनी लगेचच स्वतः हॉस्पिटलमध्ये जाऊन डॉक्टरांशी बोलून अजय सिंह यांच्या पायावर करण्यात येणाऱ्या ऑपरेशनसाठी आर्थिक मदत केली.

दरम्यान, अजय सिंहचे ऑपरेशन यशस्वी झाले आणि ते निरोगी आहेत.










**पनवेल : विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला. मतदान केंद्रांवर मतदारांनी उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी विविध मतदान केंद्रांना भेट देत मतदानाचा आढावा घेतला तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला.**






**पनवेल : विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांचा प्रतिसाद मिळाला. निलकंठ धाम सोसायटीतील नागरिकांनी रांगोळी रेखाटून लोकशाहीचा जागर केला आणि मतदानाचा हक्क बजावला. त्याचप्रमाणे सर्वांनी मतदान करावे, असे आवाहन केले.**

## संपादकीय

# दिल्लीच्या हवेचे रडगाणे

दिल्लीच्या हवेत श्वास घेणे म्हणजे रोज ५० सिगरेटी ओढल्यासारखे आहे अशी टीका परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून देण्यासाठी प्रदूषण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांकडून सध्या केली जाते आहे, परंतु तुर्तास तरी सर्व उपाय थकल्यासारखी परिस्थिती दिसते. एक मोठा पाऊस झाल्याखेरीज दिल्लीकरांची यातून सुटका नाही बहुतेक. परिस्थिती गंभीर होण्याआधीच काही उपाययोजना का केली जात नाही, असा सवाल आता सर्वोच्च न्यायालयाने केला असून तो योग्यच आहे.

**दिल्लीचे प्रदूषण ही आता बहुदा गांभीर्याने घेण्याजोगी समस्या उरली नसून कुणालाच ज्यात काहीही बदल करता येत नाही असे हे न टाळता येण्याजोगे वास्तव बनले आहे की काय? गेली काही वर्षे आपल्याकडच्या हिवाळ्याची सुरूवातच मुळी दिल्लीतले प्रदूषण कसे भयावहरित्या वाढले आहे या हाळीने होते तसेच ते या वर्षीही झाले. सर्वोच्च न्यायालयाने सर्व संबंधितांची वारंवार कानउघाडणी करूनही बुधवारी राजधानी दिल्ली हे अवघ्या जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले. आणखी दुर्दैवाची बाब म्हणजे जगभरातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत उत्तर भारतातील आठ शहरे आहेत. खरे तर गेली काही वर्षे दरवर्षी या पट्ट्यात हेच चित्र दिसते. सर्वोच्च न्यायालयाने दरवर्षी धारेवर धरल्याने दिल्ली तसेच आजूबाजूच्या राज्यांनी यासंदर्भात काही उपाययोजना केल्याचेही सांगितले जाते, परंतु बहुदा त्या कुचकामी ठरल्या असाव्यात असेच आता म्हणावे लागेल. कारण या परिसरातील प्रदूषणाची समस्या कायम असून बुधवारी दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक ४३८ पर्यंत गेल्याने ते जगातील सर्वात प्रदूषित शहर ठरले. या निर्देशांकामुळे हवेत किती प्रदूषके आहेत ते कळते. गेल्या आठवड्यापासून उत्तर भारतातील या पट्ट्यात थंडी अवतरू लागली आणि पाठोपाठ नेहमीचे हे प्रदूषणाचे रडगाणे सुरू झाले. थंडी, दाट धुके आणि वाऱ्याचा मंद प्रवाह यामुळे हवेत धुळीचे, धुराचे कण साचून राहतात. हवेची घनता जास्त असल्यामुळे दहा मायक्रॉनच्या वरील प्रदूषित कणही जमिनीवर लवकर पडत नाहीत. वाऱ्याचा प्रवाह मंद असल्यामुळेच उत्तर भारतातील शहरांचा हवा गुणवत्ता निर्देशांक सध्या बिघडला आहे. अशीच काहिशी परिस्थिती मुंबई शहर मान्सूनच्या परतीच्या काळात अनुभवते. हवेत दमटपणा असतो पण वाऱ्यांचा वेग मंदावतो आणि त्या काळात धुळीचे कण खाली न बसता हवेत तसेच साचून राहतात. राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार बुधवारी दुपारी चार वाजता दिल्लीची नोंद जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून झाली. नेमाने येणाऱ्या हिवाळ्याइतक्याच नेमाने उद्भवणाऱ्या या विषारी वायू प्रदूषणामुळे दिल्लीकरांची अवस्था मोठी बिकट झाली आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की तेथील शाळांना सुटी देण्याची वेळ आली. गेले सलग पाच दिवस दिल्ली शहराचा वायु गुणवत्ता निर्देशांक सरासरी ५०० अंकाच्या अतिगंभीर पातळीवर राहिला आहे. नेहमीचाच कारखान्यांचा धूर, रस्ते तसेच बांधकामांमुळे उडणारी धूळ, शेतातील काडीकचरा (पाचट) जाळण्यामुळे शेजारच्या राज्यांतून येणारा धूर या साऱ्या कारणांमध्ये दिवाळीच्या फटाक्यांच्या प्रदूषणाची आणखी भर पडते. या साऱ्याच्या परिणामी येथील नागरिकांना चक्क डोळे जळजळणे, श्वास घेण्यास त्रास होणे, घसा धरल्याने गिळण्यास त्रास होणे, घसा खवखवणे यांसारख्या अनेक समस्या उद्भवतात. हवा श्वसनयोग्य म्हणवण्यासाठी प्रदूषकांचे प्रमाण ५०च्या आत हवे. दिल्लीतील हवेत सध्या त्याच्या दहापट प्रदूषके आहेत!**

# कर्जत, अलिबाग, उरण, महाड मतदारसंघात चुरस



**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत रायगड जिल्ह्यात सात मतदारसंघांमध्ये बुधवारी काही किरकोळ अपवाद वगळता शांततेत मतदान झाले. जिल्ह्यात अंदाजे ७० टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. २०१९च्या तुलनेत रायगड जिल्ह्यात यंदाच्या विधानसभा निवडणुकीत दोन टक्क्यांनी मतदान वाढले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६०.५१ टक्के मतदान झाले होते. लोकसभेच्या तुलनेत विधानसभा निवडणुकीत १० टक्के मतदान वाढले आहे. या वाढलेल्या मतदानाच्या टक्क्यामुळे उमेदवारांची धाकधूक वाढवली आहे. वाढलेल्या मतदानामुळे काही मतदारसंघातील निकाल अनपेक्षित लागतील.

रायगड जिल्ह्यात पनवेल, उरण, कर्जत, पेण, अलिबाग, श्रीवर्धन व महाड असे सात विधानसभा मतदारसंघ आहेत. या सर्वच मतदारसंघांमध्ये विद्यमान आमदार उमेदवार आहेत. प्रत्येक पक्षाने आपल्या विद्यमान आमदारांनाच उमेदवारी देण पसंत केले. यातील पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर व श्रीवर्धमध्ये महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांच्यासाठी निवडणूक सोपी होती. या दोन मतदारसंघांतील निकाल बदलणार नाही, परंतु उर्वरित पाच मतदारासंघांमध्ये चुरस आहे. मागील अडीच वर्षात बदलेल्या राजकीय समीकरणांमुळे काही मतदारसंघांमध्ये राजकीय परिस्थिती बदलली आहे. नव्याने निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीमुळे उरण, कर्जत, अलिबाग, महाड या चार विधानसभा मतदारसंघात चुरस निर्माण झाली आहे. अलिबागमध्ये एकतर्फी वाटणारी लढत रंगतदार अवस्थेत पोहचली. कर्जतमध्ये सुधाकर घारे यांची उमदेवारी या मतदारसंघातील निकाल बदलणार का, अशी चर्चा आहे. उरणमध्ये तीन तुल्यबळ उमेदवार आहेत. महाडध्ये दोन तुल्यबळ उमेवारांमध्ये लढत असल्यामुळे येथे रंगत वाढली आहे.



पनवेलमध्ये १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. खरी लढत भाजपचे विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर आणि शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्यात होणार आहे. यात विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर यांचे पारडे जड आहे. या मतदारसंघात महिला मतदारांनी जास्त मतदान केले आहे. याचा फायदा प्रशांत ठाकूर यांना होईल.

उरण मतदारसंघात १४ उमेदवार आहेत. येथे भाजपचे विद्यमान आमदार महेश बालदी, शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार मनोहर भोईर, शेकापचे प्रितम म्हात्रे यांच्यात तिरंगी लढत आहे. तीनही उमेदवार तुल्यबळ आहे. पाच वर्षे आमदार राहिल्यामुळे आमदार महेश बालदी यांचा संपर्क आहे. भोईर आणि म्हात्रे हे दोन आगरी उमेदवार आहेत. आगरी मतांचे या दोघांमध्ये विभाजन होईल. महाविकास आघाडीत या मतदारसंघात बिघाडी झाली आहे. त्याचा फायदा बालदी यांना होईल. ग्रामीण भागातील मतदारांनी कुणाला मतदान केले आहे यावर निकाल अवलंबून असेल.

कर्जत मतदारसंघात नऊ उमेदवार आहेत. येथे महायुतीचे आमदार महेंद्र थारवे यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे नितीन सावंत आहेत. येथे थेट लढत अपेक्षित होती, पण राष्ट्रवादीचे सुधाकर घारे यांनी बंडखोरी केली. त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवत पूर्ण ताकद लावली. घारे यांच्या उमेदवारीमुळे येथे तिरंगी लढत आहे. या मतदारसंघांत चुरस निर्माण झाली आहे. वाढलेल्या मतदानाच्या टक्क्यामुळे येथे धक्कादायक निकाल लागू शकतो.

पेणमध्येदेखील महाविकास आघाडीत बिघाडी झाली आहे. येथे महायुतीने भाजपचे आमदार रविशेठ पाटील यांना उमेदवारी दिली आहे. रविशेठ पाटील यांच्याविरोधात शेकापचे अतुल म्हात्रे, शिवसेना ठाकरे गटाचे प्रसाद भोईर यांच्या खरी लढत होईल. रविशेठ पाटील यांचा चांगला संपर्क आहे. खासदार धैर्यशील पाटील त्यांच्यासोबत आहेत. एकूणच येथील परिस्थिती पाहता रविशेठ पाटील आणि प्रसाद भोईर यांच्या लढत होईल. तरीदेखील रविशेठ पाटील यांचे पारडे जड आहे.

अलिबाग विधानसभा मतदारसंघात १४ उमेदवार आपले राजकीय भवितव्य आजमावत आहेत. तरी शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी, शेकापच्या चित्रलेखा पाटील व अपक्ष दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ यांच्यात लढत होईल. दिलीप भोईर किती मत घेतात आणि मुरूड तालुक्यात कुणाला जास्त मते पडतात यावर या मतदारसंघाचा निकाल अवलंबून असेल.

श्रीवर्धनमध्ये ११ उमेदवार आहेत. येथे राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत आहे. महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे या राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या उमेदवार आहेत, तर अनिल नवगणे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पावर गटाचे उमेदवार आहेत. या मतदारसंघात आदिती तटकरे यांनी विकासकामे केली आहेत. त्याचा या मतदारसंघात चांगला जनसंपर्क आहे. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

महाड विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी पाच उमेदवार आहेत. येथे शिवसेनेचे आमदार भरत गोगावले व शिवसेना ठाकरे गटाच्या स्नेहल जागताप यांच्यात अटीतटीची लढत होईल. भरत गोगावले यांचा जनसंपर्क आहे, तर स्नेहल जगताप यांना सहानुभूती आहे. येथे वाढलेला मतदानाचा टक्का कदाचित अनपेक्षित निकाल देऊ शकतो. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल, तेव्हा मतदारांनी कुणाच्या बाजूने कौल दिला आहे ते तेव्हाच स्पष्ट होईल.



## बदलते तंत्रज्ञान

# एका चुकीमुळे 'जिओ'ची कॉल हिस्ट्री जाईल दुसऱ्याच्या हाती

जिओ युजर्सना त्यांची एक चूक महागात पडू शकते आणि त्यांची कॉल हिस्ट्री दुसऱ्याच्या हातात जाऊ शकतो. अशा परिस्थितीत याचा लाखो युजर्सवर मोठा परिणाम होऊ शकतो. रिलायन्स जिओचे भारतात ४५ कोटींहून अधिक सक्रिय युजर्स आहेत.




जिओ युजर्स आपल्या फोनचा रिचार्ज प्लॅन, व्हॅलिडिटी इत्यादी तपासण्यासाठी फोनमध्ये माय जिओ इन्स्टॉल करतात. अशीच एक सुविधा माय जिओमध्ये दिली आहे, जिथे तुमच्या प्रीपेड नंबरवरून केलेल्या सर्व कॉलची हिस्ट्री दिसते. त्यामुळे युजर्सकडून छोटीशी चूक झाली तर ही कॉल हिस्ट्री कोणाच्या तरी हाती लागू शकते.

माय जिओमध्ये तुमच्या नंबरवर ॲक्टिव्ह असलेल्या सर्व सर्व्हिसची डिटेल्स असते, ज्यामुळे एखाद्याला त्याचा ॲक्सेस मिळणे धोकादायक ठरू शकते. माय जिओमध्ये लॉग इन करण्यासाठी युजर्सचा मोबाईल नंबर आवश्यक आहे. यानंतर नंबरवर एक ओटीपी प्राप्त होईल, जो प्रविष्ट केल्यानंतर तुम्हाला या ॲपमध्ये ॲक्सेस मिळतो.

जर चुकून एखाद्याने माय जिओ ॲपवर लॉग इन करण्यासाठी तुमचा जिओ नंबर वापरला आणि चुकून त्याला ओटीपी आला तर तुमचे सर्व गुपित उघड होऊ शकतात. तुम्ही कोणत्या नंबरवर कॉल केला, किती वेळा आणि किती वेळ केला याची माहिती मिळेल.

इतकेच नाही तर कोणीतरी तुमच्या नंबरवर सक्रिय इंटरनेट डेटा पॅक आणि इतर सर्व्हिसेसची माहिती देखील मिळवू शकते. अशा परिस्थितीत तुम्ही चुकूनही तुमचा ओटीपी कोणाशीही शेअर करू नये. माय जिओ ॲपमध्ये तुम्ही तुमच्या नंबरवरून कॉल आणि मेसेजची हिस्ट्रीदेखील तपासू शकता. यासाठी तुम्हाला तुमच्या फोनमध्ये माय जिओ ॲप इन्स्टॉल करावे लागेल आणि तुमच्या जिओ नंबरने लॉग इन करावे लागेल.

कॉल हिस्ट्री तपासण्यासाठी पहिल्यांदा फोनमध्ये माय जिओ डाउनलोड व इन्स्टॉल करा. यानंतर जिओ नंबरने लॉग इन करण्यासाठी नंबर आणि ओटीपी टाका. तुम्ही ॲपमध्ये लॉग इन करताच तुम्हाला माय जिओ ॲपचा इंटरफेस दिसेल. येथे तुम्हाला तुमचे नाव आणि प्रोफाइल आयकॉन उजव्या वरच्या कोपऱ्यात दिसेल. त्यावर टॅप करताच तुम्हाला मोबाईलचा ऑप्शन दिसेल. तुम्ही येथे टाइप करताच, स्टेटमेंटवर जा आणि तुमच्या नंबरवरून केलेल्या कॉलची हिस्ट्री तपासा.

# नाटककार, गायिका, संगीतकार हिराबाई पेडणेकर



**निमित्त**

हिराबाई पेडणेकर या पहिल्या स्त्री नाटककार, गायिका, संगीतकार होत्या. त्यांचा जन्म २२ नोव्हेंबर १८८६ रोजी सावंतवाडीमध्ये संगीत, नृत्याची जाण असणाऱ्या घराण्यामध्ये झाला.

हिराबाई या गोव्यातील गोमंतक मराठा समाजाच्या. गोवा, सिंधुदुर्ग, कारवार परिसरातील अनेक मोठ्या देवळांच्या परिसरात कलावंत, देवळी, भावीण, पेरणी, बांदे, फर्जंद, चेडवा अशा देवळात सेवा देणाऱ्या पोटजातींच्या समूहाला 'देवदासी' असे नाव मिळाले. या समाजातही स्त्रियांना देवाला वाहण्याचा सेषविधी होता, पण तो प्रत्येक बाईला बांधील नव्हता. या समाजात नृत्य, संगीतात मुली वाकबगार असत. या देवदासी समाजातील सर्व पोटजातींमध्ये ऐक्य घडवण्याचा प्रयत्न झाला. त्यातून या समाजाचे नाव नाईक मराठा समाज आणि शेवटी गोमंतक मराठा समाज ठरले. हिराबाई पेडणेकर हा सगळा वारसा घेऊन जन्मल्या, त्यातूनच त्यांच्या ठायी असलेल्या लेखन व इतर ललित कलांना प्रेरणा मिळाली. हिराबाई वारांगना नव्हत्या. त्या फक्त बैठकीचे गाणेच करायच्या.

मुंबईतील मिशन स्कूलमध्ये त्या शिकल्या. हिराबाईंचे शिक्षण अवघे सातवीपर्यंतच झाले. धनिक प्रेमचंद रायचंद यांच्या घरात त्या वाढल्या, त्या मावशी भीमाबाईमुळे. मावशीने या भाचीला मुंबईत आणून शिक्षण दिले. न.चिं. केळकर, चिंतामणराव वैद्य, गोविंद बल्लाळ देवल, राम गणेश गडकरी, वि. सी. गुर्जर, रेंदाळकर, बालकवी ठोंबरे, मामा वरेरकर हे याच गांजावाला चाळीचा जिना चढले ते हिराबाईंचे गाणे ऐकायला. तेही श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या आग्रहामुळेच. हिराबाईंना मराठी व संस्कृत उत्तमरीत्या येत होते. त्याशिवाय हिंदी, बंगाली, इंग्लिश या भाषांचा काही अभ्यास त्यांनी केला होता. त्या उत्तम कविताही करत असत.

'मनोरंजन' आणि 'उद्यान' या दोन प्रसिद्ध साप्ताहिकात हिराबाईंच्या कविता प्रसिद्ध होत असत. त्यात त्यांनी 'माझे आत्मचरित्र' नावाची जी लघुकथा लिहिली होती. हिराबाईंनी गाण्याचे अधिक शिक्षण पं. भास्करबुवा बखले यांच्याकडून घेतले.

हिराबाईंनी लिहिलेल्या नाटकांपैकी 'जयद्रथ विडंबन' (१९०४) व 'संगीत दामिनी' (१९१२) या नाटकांचा विशेष बोलबाला झाला. एका पौराणिक कथानकाच्या आधारे त्यांनी जयद्रथ विडंबन हे नाटक लिहिले होते व त्यावर देवल शैलीच्या नाट्यलेखनाचा प्रभाव होता. स्त्रीशिक्षणाविषयी हिराबाईंना विलक्षण कळकळ होती. 'संगीत दामिनी'मध्ये त्यांच्या या विचारांचे प्रतिबिंब दिसते. या नाटकात एकूण बहात्तर पदे आहेत, हेही एक वैशिष्ट्य.

हिराबाई पेडणेकरांनी लिहिलेली 'कवी जयदेवाची पत्नी', 'मीराबाई' ही नाटके मात्र तेवढीशी गाजली नाहीत. हिराबाई पेडणेकर हा मराठी नाट्यसृष्टीतील असा आविष्कार होता की, जो काही काळच तेजाने तळपला व नंतर प्रसिद्धीच्या झोतापासून इतका दूर गेला की, त्यांची आठवणही खूप कमी लोकांनी राखली. अशा या कर्तृत्ववान स्त्री नाटककाराचे १८ ऑक्टोबर १९५१ रोजी निधन झाले. त्या आज आपल्यात देहरूपी नसल्या तरी स्मृतीरूपी चिरंतन स्मरणात राहणार आहेत.

**क्लिक...क्लिक...!**



मुरुड : मतदानासाठी कोळी बांधव घरी आल्याने राजपुरी खाडीत बोटी शाकारण्यात आल्या होत्या. (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी खा हे पदार्थ

सध्या हिवाळ्याला सुरुवात झाली असून वातावरणातील गारवा वाढला आहे. हिवाळ्यात रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे आणि हवामानातील बदलामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. अनेक जण लवकर आजारी पडतात. अशा वेळी रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी आणि आरोग्याच्या समस्या समस्या दूर करण्यासाठी हिवाळ्यात काही विशिष्ट खाद्यपदार्थांचे सेवन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.



तुम्हाला प्रश्न पडला असेल की, हे पदार्थ नेमके कोणते आहेत? याविषयी न्युट्रिशनिस्ट अपूर्वा अग्रवाल यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून या पदार्थांविषयीची माहिती दिली आहे. हे पदार्थ तुम्हाला हिवाळ्यात निरोगी ठेवण्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. हिवाळ्यात कोणते पदार्थ का खावेत? याविषयी अपूर्वा अग्रवाल यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

तूप : आपल्याला वाटते की, तूप कॅलरीज वाढवते, पण तुपाचे योग्य प्रमाणात सेवन केल्यावर शरीरातील खराब चरबी कमी होते आणि शरीर उबदार ठेवण्यास मदत मिळते.

गूळ : पचनक्रिया सुधारण्यासाठी गूळ हा अत्यंत फायदेशीर पदार्थ आहे, जो आपल्याला हिवाळ्यात उबदार ठेवतो.

गरम सूप : हिवाळ्यात सायंकाळी एक वाटी गरम सूप प्यायला कोणाला आवडत नाही? झटपट उब मिळविण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे.

सुका मेवा : हिवाळ्यात सुका मेवा हा एक उत्तम पर्याय असतो. ॲप्रिकोट, अंजीर, खजूर नैसर्गिक उबदारपणा देतात.

केशर : हिवाळ्यात तुमचे शरीर उबदार ठेवायचे असेल, तर तज्ज्ञांच्या मते, दुधात केशर उकळून, त्यात मनुके टाकावेत.

धान्य : बाजरी, नाचणी यांसारख्या धान्यांचा हिवाळ्यात तुम्ही आस्वाद घेऊ शकता.

दालचिनी : चयापचय क्रिया सुधारण्यासाठी दालचिनी फायदेशीर आहे. दालचिनीच्या सेवनाने शरीरात उष्णता निर्माण करण्यास मदत होते आणि म्हणूनच हिवाळ्यात दालचिनीचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे.

तीळ : श्वसनाशी संबंधित अनेक आजार दूर ठेवण्यास तीळ मदत करतात. तिळाचे लाडू, तिळाची बर्फी इत्यादी स्वादिष्ट पदार्थांचा तुम्ही आस्वाद घेऊ शकता.

तुळशी आणि आले : तुम्ही कधी चहामध्ये आले आणि तुळशीचे पाने टाकून पाहिले आहे का? एकदा करून पाहा. आले आणि तुळशीच्या पानांचा चहा अत्यंत आरोग्यदायी आहे.

मध : सर्दी, फ्ल्यूचा सामना करण्यासाठी मध उपयुक्त आहे.

# रायगडात मतमोजणीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या निवडणुकीच्या मतमोजणीची तयारी पूर्ण झाली असून निवडणूक यंत्रणा मतमोजणीसाठी तयार झाली आहे. याकरिता १८१ मतमोजणी पर्यवेक्षक, २०४ मतमोजणी सहाय्यक, १६५ मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक, १८३ इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२), ९८६ इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३), ७३४ चतुर्थ श्रेणी कर्मचारी अशी एकूण दोन हजार ४५३ अधिकारी, कर्मचाऱ्यांची मतमोजणीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

पनवेल अे.आर.कालसेकर पॉलिटेक्नीक कॉलेज, पनवेल, ठाणा नाका जवळ, कर्नाळा स्पोटर्स अ‍ॅकेडमी समोर, पनवेल येथे मतमोजणी होणार असून मतमोजणीसाठी येथे टेबलची संख्या २४ आहे. मतमोजणीच्या एकूण फेऱ्यांची संख्या २५ आहे. मतमोजणी पर्यवेक्षक ३८, मतमोजणी सहाय्यक ३८, मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक ३८, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२) ४५, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३) ३१०, चतुर्थ श्रेणी कर्मचारी २२० तर मतमोजणीसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून दुनी चंद्र राणा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कर्जत येथे मतमोजणीसाठी टेबलची संख्या १४ आहे. मतमोजणीच्या एकूण फेऱ्यांची संख्या २६ आहे. मतमोजणी पर्यवेक्षक २३, मतमोजणी सहाय्यक २९, मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक २३, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२) २१, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३) १०६, चतुर्थ श्रेणी कर्मचारी ११९ तर मतमोजणीसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून जगदीप धंदा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उरणमध्ये जासई येथे मतमोजणी होणार असून मतमोजणीसाठी येथे टेबलची संख्या १४ आहे. मतमोजणीच्या एकूण फेऱ्यांची संख्या २५ आहे. मतमोजणी पर्यवेक्षक २३, मतमोजणी सहाय्यक २८, मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक २३, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२) १०, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३) ९०, चतुर्थश्रेणी कर्मचारी ११० तर मतमोजणीसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून राजेश कुमार आयव्ही यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पेण के.ई.एस.लिटील एंजल स्कूल, पेण येथे मतमोजणी होणार असून मतमोजणीसाठी येथे टेबलची संख्या १४ आहे. मतमोजणीच्या एकूण फेऱ्यांची संख्या २७ आहे. मतमोजणी पर्यवेक्षक २४, मतमोजणी सहाय्यक ३०, मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक १७, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२) ३०, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३) ११०, चतुर्थ श्रेणी कर्मचारी ८० तर मतमोजणीसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून संतोष कुमार राय यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अलिबाग जिल्हा क्रीडा संकुल नेहुली-खंडाळे येथे मतमोजणी होणार असून मतमोजणीसाठी येथे टेबलची संख्या १४ आहे. मतमोजणीच्या एकूण फेऱ्यांची संख्या २७ आहे. मतमोजणीसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून रुही खान यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी कार्यालय श्रीवर्धन सभागृह, मध्यवर्ती प्रशासकीय भवन, पहिला मजला, श्रीवर्धन येथे मतमोजणी होणार असून मतमोजणीसाठी येथे टेबलची संख्या १४ आहे. मतमोजणीच्या एकूण फेऱ्यांची संख्या २५ आहे. मतमोजणीसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून सतीश कुमार एस यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाड भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड बहुउद्देशीय सभागृह येथे मतमोजणी होणार असून मतमोजणीसाठी येथे टेबलची संख्या १४ आहे. मतमोजणीच्या एकूण फेऱ्यांची संख्या २८ आहे. मतमोजणी पर्यवेक्षक २४, मतमोजणी सहाय्यक २४, मतमोजणी सूक्ष्म निरीक्षक २४, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-२) ३०, इतर पथकातील अधिकारी (वर्ग-३) ११०,चतुर्थ श्रेणी कर्मचारी ८० तर मतमोजणीसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून आदित्य कुमार प्रजापती यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## खोपोलीत बसचा अपघात

**खालापूर :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील मुंबई वाहिनीवर नवीन बोगद्यात अपघात झाला आहे. बसवरील चालक मंजुनाथ चन्नाबसप्पा (वय ४१, रा.बंगलोर, कर्नाटक) हे बंगलोर ते मुंबई असे २० प्रवाशी घेवुन एक्सप्रेस हायवेने जात असताना अपघात ठिकाणी आले. या वेळी उतारावर बसवरील नियंत्रण सुटल्याने बोगद्याच्या भिंतीस घासल्याने अपघात झाला आहे. अपघातात बस मधील तीन प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्याने त्यांचेवर आयआरबी कडील अँबुलन्सने जागेवरच उपचार करण्यात आले आहेत. प्रवाशांना दुसऱ्या बसमध्ये बसवून ते पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाले आहेत.


**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given to the public at large that my client has agreed to purchase and acquire all the rights, title and interest in respect of the property described hereinunder from the owners, Mr. Pintya Trimbak Patil and Mr. Ramesh Dharma Mhatre. The said Owners, Mr. Pintya Trimbak Patil and Mr. Ramesh Dharma Mhatre have assured my client that they have absolute right, title and interest in and over the said property, which is clear, clean and marketable and is free from encumbrances and that they have not entered into any agreement, oral or written, with any person or party in any manner whatsoever.

Any person having any claim by way of sale, lease, inheritance, lien, gift, mortgage, pawn, pledge etc. whatsoever and howsoever is required to intimate the undersigned at his office address given herein below, within a period of 10 days from the date of publication hereof, **strictly along with the documents pertaining to claim,** failing which all such claims, if any, shall be deemed to have been knowingly abandoned or waived, and any claims, raised after the expiry of the said period of 10 days shall not be entertained, presuming that there are no claims.

**DESCRIPTION OF PROPERTY**

All that piece and parcel of part admeasuring 0.40.00 (H.R.P) of the property being Gut No. 93, Hissa No. 2, situated at Village – Dhansar, Tal. Panvel, Dist. Raigad standing in the name of Mr. Pintya Trimbak Patil and Mr. Ramesh Dharma Mhatre.

| TYPE OF LAND | Survey No | Hissa No | Area हे. आर.पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| Class - I | 93 | 2 | 0.40.00 | 2.29 |
| | | TOTAL | 0.40.00 | 2.29 |

sd/-
Adv. Vishal V. Jaju,
High Court, Bombay
Advocate, High Court, Bombay
401, A Wing , The Great Eastern Summit,
Plot No. 56, Sector – 15, CBD Belapur,
Navi Mumbai 400614.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही खालील नमूद केलेल्या भोगवटादार सदरी गावकरी लोक मोर्चे वहिवाटदार व १) श्री हरिचंद्र सदू नावडेकर २) श्री जयवंत नारायण खोपकर ३) श्री कृष्णा गोपाळ म्हात्रे ४) श्री मधुकर काशिनाथ पाटील सर्व रा. मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड. यांच्या नावे आहे. वर उल्लेख केलेल्या कब्जेदार सदरी नाव असलेल्या व्यक्ती या खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्रयस्थ व्यक्तीस जमीन विकण्याच्या तयारीत आहेत. असे आमच्या अशिलांचे म्हणणे आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचें वर्णन**
**मौजे खैरवाडी, ता. पनवेल, जि. रायगड. येथील जमीन मिळकती.**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) (पोटखराब्यासहीत) | आकार (रु=पै) |
|---|---|---|---|---|
| १) | २२ | - | ९-९३-०० | १५=९४ |
| २) | २३ | १ | ७-३४-३० | ११=७२ |
| ३) | २३ | २ | २- ३६-७० | ३=७८ |

सबब या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, वर उल्लेख केलेल्या जमीन मिळकती संदर्भात कोणीही व्यक्ती अथवा कोणत्याही संस्थेने गहाण, दान, भाडेपट्टा, खरेदी- विक्रीचा व्यवहार, साठेकरार, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, लीज, ताबा हक्क, कुलमुखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध निर्माण करू नये. सदरच्या मिळकती या गावकरी मोर्चे यांच्या सामाईक असल्याने वर उल्लेख केलेल्या व्यक्तींबरोबर कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. सदर मिळकती संदर्भात आमच्या अशिलांनी वर उल्लेख केलेल्या व्यक्तींविरुद्ध दिवाणी स्वरुपाची कायदेशीर कारवाई सुरु केलेली आहे. जर कोणीही व्यक्तीने अथवा संस्थेने सदर मिळकती संदर्भात कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर कायद्याने बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर व्यक्तीवर देखील कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे होणाऱ्या परिणामांस सदर व्यक्ती स्वतः जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी. कळावे.

**ठिकाण- पनवेल**
**दिनांक २१/११/२०२४**

**सही/-**
**ॲड. एच. के. म्हात्रे**
वकील - मुंबई हायकोर्ट, मोबाईल नं. ९३२०४१४३१३
पत्ता- शॉप नं. ६, गुरु वाटिका सोसायटी, ठाणा नाका रोड.
पनवेल. ता. पनवेल, जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस जाहिर कळविण्यात येत आहे की, आम्ही **मे. ए. आर. डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री रेहान आरीफ खोत व श्री. अब्दुल अजीज मोहम्मद मोहसीन पटेल, वय - सज्ञान, पत्ता - हाउस** नं. १२५ - १, **मु. पो. बोरीवली, पडघा, भिवंडी, ठाणे ४२११०१,** यांनी खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीबाबत **इब्राहीम निझामुद्दीन पटेल (मयत ) तर्फे वारस मो. नूर अब्दुल रहमान पटेल व ३८ इतर, वय - सज्ञान, पत्ता - रा. घर नं. ५२, भाटीला रोड, नवमनी मस्जिदजवळ, तळोजा पाचनंद पनवेल, तळोजे मजकूर, रायगड, तळोजा, महाराष्ट्र ४१०२०८.,** यांचे बरोबर दिनांक २९/०५/२०२४ रोजी भुखंड बयाना पावती तथा परस्पर सामंजस्य करारनामा केलेला आहे.

तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहान, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहीवाट, अ‍ॅटेचमेंट इ. अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात खालील प्रमाणे दिलेल्या पत्त्यावर समक्ष येऊन भेटावे जर अशी लेखी खबर अथवा हरकत सदर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर तसा असल्यास त्याने सोडून दिला आहे असे समजून आम्ही पुढील व्यवहार पुर्ण करु हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही व त्यास आम्ही जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**तळोजा पाचनंद, ता. पनवेल, जि रायगड**

| घर क्रमांक जुना | नवीन घर क्रमांक | क्षेत्र (चौ. फुट.) |
|---|---|---|
| 52 | TPG157 | 1369 |

दिनांक : २१ / ११ / २०२४
नवी मुंबई.

**सही /-**
**ॲड. देवेंद्र भिका पाटील**
**पत्ता- शॉप नं. १, श्रीजी सोहम, सी. एच. एस. लि., भुखंड क्रं. ७६, सेंक्टर २१, उलवे, नवी मुंबई. ४१० २०६**

**PAPER NOTICE**
**IN THE COURT OF THE CIVIL JUDGE JUNIOR DIVISION PANVEL,**
**AT PANVEL, DIST RAIGAD**
**REGULAR CIVIL SUIT NO. 237 OF 2023**

**Mr. Naranbhai Govind Halai )…Plaintiff**
**Vs**
**Dattatreya Maharaj KalambeJaoli )**
**Sahakari Bank Limited & others )… Defendants**

This is to inform the public in general and to everyone concerned that Mr. Naranbhai Govind Halai,residing at 52/53, Premnagar, Navavas Opp. Sarvoday Sport Ground, Madhapar, Bhuj, Kutch, Gujarat – 370020,Plaintiff herein is a bonafied purchaser and lawful owner of the said Suit Property mentioned in the schedule herein below, vide registeredAgreement dated 08/01/2018, duly registered under the office of Sub-Registrar Panvel – 3 under document Serial No. 220/2018.He is also in lawful possession of the Suit Property mentioned in the Schedule herein below. It is informed that the above suit for declaration and permanent injunction as to the said suit property is filed against the Defendants by the Plaintiff alongwith the application for interim and ad-interim reliefs. The same is pending before the Hon'ble Court. The Defendant No. 1, i.e.**Dattatreya Maharaj KalambeJaoliSahakari Bank Limited** is in process of auctioning the said Flat. This is to inform everyone concerned and public in general that any transaction with reference to the said Suit Property will be illegal, not binding on the Plaintiff,subject to ownership and possession of the Plaintiff herein and the outcome of the Suit mentioned hereinabove. Intending purchasers are hereby notified to not to enter into any transactions whatsoever with reference to the Suit Property.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Flat No. B/904, admeasuring about 61.00 Sq.Mtrs built up area and 12.262 Sq. Mtrs. Terrace area, in the project named Amrut View CHS, G.E.S. Plot No. 47 and 48, Sector – 03, Karanjade, Panvel, Dist. Raigad– 410206 along with the reserved car parking.

Mr. Naranbhai Govind Halai
Ph No. +91 9825456265

For Mr. Naranbhai Govind Halai
Adv Chinmay S. Athalye
Ph No. +91 8108200585

**PAPER NOTICE**
**IN THE COURT OF THE CIVIL JUDGE JUNIOR DIVISION PANVEL,**
**AT PANVEL, DIST RAIGAD**
**REGULAR CIVIL SUIT NO. 293 OF 2023**

**Mr. DhirendrakumarTarunshankar Soni )…Plaintiff**
**Vs**
**Dattatreya Maharaj KalambeJaoli )**
**Sahakari Bank Limited & others )… Defendants**

This is to inform the public in general and to everyone concerned that Mr. DhirendrakumarTarunshankar Soni, residing at 109- B/1, B/H Bhuj, English School Street, Gayatri Krupa, Vijayanagar, Bhuj City, Kutch, Gujarat – 370001, Plaintiff herein is a bonafied purchaser and lawful owner of the said Suit Property mentioned in the schedule herein below, vide registered Agreement dated 19/01/2018, duly registered under the office of Sub-Registrar Panvel – 3 under document Serial No. 580/2018. He is also in lawful possession of the Suit Property mentioned in the Schedule herein below. It is informed that the above suit for declaration and permanent injunction as to the said suit property is filed against the Defendants by the Plaintiff alongwith the application for interim and ad-interim reliefs. The same is pending before the Hon'ble Court. The Defendant No. 1, i.e. **Dattatreya Maharaj KalambeJaoliSahakari Bank Limited** is in process of auctioning the said Flat. This is to inform everyone concerned and public in general that any transaction with reference to the said Suit Property will be illegal, not binding on the Plaintiff, subject to ownership and possession of the Plaintiff herein and the outcome of the Suit mentioned hereinabove. Intending purchasers are hereby notified to not to enter into any transactions whatsoever with reference to the Suit Property.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Flat No. B/604, admeasuring about 61.00 Sq.Mtrs built up area and 14.399 Sq. Mtrs. Terrace area, in the project named Amrut View CHS, G.E.S. Plot No. 47 and 48, Sector – 03, Karanjade, Panvel, Dist. Raigad – 410206 along with the reserved car parking.

Mr. Dhirendrakumar Tarunshankar Soni
Ph No. +91 9824218290

For Mr. DhirendrakumarTarunshankar Soni
Adv Komal Panjuani
Ph No. +91 8879054933

**IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION**
**PANVEL AT RAIGAD**
**MISC. APPLICATION NO. 1219 OF 2024**

Ext. 8
ND : 02 /01/2025

**MR. ASHWANI KUMAR PUSHKARNA**
AGED 67 YEARS, OCC- RETIRED ...APPLICANT
VERSUS
NIL ...OPPONENT

WHEREAS the above-named applicant has filed the Miscellaneous Application for **HEIRSHIP CERTIFICATE** under Sec. 2 of the Bombay Regulation Act, 1827, Regulation No. VIII in the Court of Civil Judge (S.D.) Panvel at Raigad, in respect of the property mentioned hereinunder in the schedule standing in the name of **LATE SMT. PRAKASHVATI PUSHKARNA** who expired on 16th June 2018.

AND WHEREAS if any person has objections, title, claim, share, etc. in the property herein-under mentioned then they may appear in person or through their advocate, objecting this application. If no one appears and objects, for the same within 30 days from the date of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary orders thereon.

**SCHEDULE OF PROPERTY**

**50% Share in Right, Title and interest of all that flat premises bearing Flat no. H-1103 (DAFFODIL), 11th Floor, having Built-up area of 805 sq. ft. i.e. 74.73 sq. Mtrs. along with open car parking No. 249, admeasuring built-up area of 135 sq. ft. approximately, of the said building know as JAL VAYU VIHAR PHASE I in "JAL VAYU DEFENCE ENCALAVE CO-OPERATIVE HOUSING SOCIETY", constructed on Plot No. 20 in Sector No. 20, at Kharghar, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad within the limits of CIDCO Ltd./Panvel Municipal Corporation.**

Given under my hand and seat of this Court on this 16" day of NOVEMBER 2024

court stamp

**Sd/-**
**Asst Supted.**
**Civil Court S.D., Panvet**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to public at large that Power of Attorney executed between Smt Shakuntala Santaram Thakur, Smt Gangabai Dhanaji Mhatre, Smt Maibai Madhukar Bhoir, Smt Chandrabhaga Changu Patil alies Smt Chandrabai Padaji Gharat, the undersigned Principal have issued Power of Attorney dated 09/11/2017 to Mr Ganesh Ganpat Mhatre, which Smt Chandrabhaga Changu Patil alies Smt Chandrabai Padaji Gharat do hereby REVOKE in its Entirety as the Power of Attorney is forged and void, the said unregistered Power of Attorney was duly notarized on 09/11/2017 vide Noted and Register No.836/2017 is being cancelled by Smt Chandrabhaga Changu Patil alies Smt Chandrabai Padaji Gharat residing at: House No.79, Near Hanuman Mandir, At Post Wahal, Taluka Panvel, Dist Raigad.one of the Principal/ Executants due to unavoidable circumstances, Notice of this revocation of Power of Attorney shall be binding on every person or entity. The parties hereto confirm that from the date of execution hereof, the said Power of Attorney dated 09/11/2017 shall stand cancelled/ rescinded and that all and whatsoever the rights towards the said Plot more particularly described in the below mentioned Schedule hereunder written stands surrendered/ extinguished and hereto record cancellation of the said Power of Attorney. This undersigned absolves from liability of any person who acts in accordance with this Power of Attorney and the principal will not be held liable to any of the transaction executed through this Power of Attorney.

**Description of Property**
**Village Owale, Taluka Panvel, District Raigad**

| Survey No | Hissa No | Area (Hectares) | Assessment Rs.Ps. |
|---|---|---|---|
| 33 | 1 | 0-10-6 | 2-62 |
| 163 | 11 | 0-06-6 | 1-06 |
| 38 | 14 | 0-10-7 | 0-25 |
| 40 | 17 | 0-12-0 | 0-41 |
| 40 | 20D | 0-38-0 | 0-86 |
| 40 | 20A | 0-23-01 | |
| 1 | 1 | 1-23-7 | |
| 163 | 8 | 0-39-9 | |
| 42 | 9 | 0-05-3 | |

**Dated : 21/11/2024**

**sd/-**
**Smt Chandrabhaga Changu Patil**
**Alies Smt Chandrabai Padaji Gharat**

सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**
**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा/ वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि. क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | |
| १ | उलवे २३० | गव्हाण ३ | ५१/१<br>५२/४ | ०-०५-८<br>०-६९-० | ६५० चौ.मी. | भूखंड क्र.२०१, सेक्टर-१९, क्षेत्र-६४९.७५ चौ.मी. | **कै. श्रावण महादु ठाकूर (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. बबन श्रावण ठाकूर<br>२) श्री. मोहन श्रावण ठाकूर<br>३) श्रीमती शांताबाई रघुनाथ गोंधळी उर्फ शांताबाई श्रावण ठाकूर<br>४) श्रीमती सोमूबाई गोपिनाथ ठाकूर<br>५) श्री. शशिकांत गोपिनाथ ठाकूर<br>६) श्री. प्रल्हाद गोपिनाथ ठाकूर व<br>७) श्रीमती सुवर्णा सतिष कनेकर उर्फ सुवर्णा गोपिनाथ ठाकूर | -- |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितानी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/३३०/२०२४-२५**

# नवी मुंबईत अमली पदार्थांची विक्री वाढली

## वाशीमध्ये गर्दुल्ल्यांकडून सेवन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत विविध ठिकाणी अमली पदार्थांची विक्री जोरात सुरू आहे. त्यानुसार वाशी सेक्टर २६ येथील मोकळ्या भूखंडावर गर्दुल्ल्यांकडून त्याचे सेवन केले जात आहे. त्याबरोबर त्याची विक्रीदेखील होत असल्याने परिसरात महिलावर्गामध्ये भीतीचे वातावरण आहे.



नवी मुंबई शहराला अमली पदार्थाचा विळखा पडू लागला आहे. एपीएमसी परिसर त्याचे केंद्रबिंदू असल्याचे बोलले जात आहे. येथील एकता नगर झोपडपट्टी, कोपरी गाव साईबाबा मंदिराजवळ अमली पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात केली जात आहे. याठिकाणी गामी जेड इमारतीजवळ सिडकोचा मोकळा भूखंड आहे. याच भूखंडात पडीक बांधकामाजवळ काही गर्दुल्ल्यांकडून मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांच्या विक्रीसह सेवन केले जात आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणावर तरुणांची गर्दी दिसून येत आहे. त्यामुळे या ठिकाणी एखादा अनुचित प्रकार घडू शकतो, असे स्थानिकांकडून बोलले जात आहे. सायंकाळनंतर या परिसरात ये-जा करण्यासाठी महिलावर्गाकडून भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिसांनी येथील अमली पदार्थ विक्रेत्यांच्या मुसक्या आवळाव्या, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

सेक्टर २६ मध्ये अशा प्रकारे अमली पदार्थांची विक्री केली जात असेल तर त्या जागेची तत्काळ तपासणी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल तसेच या ठिकाणी गस्तदेखील वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय शिंद यांनी सांगितले.

### २६ हजारांचा गांजा जप्त

गुन्हे शाखा पोलिसांनी महापे एमआयडीसीमधून २६ हजार रुपयांचा गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी एका महिलेवर रबाळे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. साईबाई पवार असे महिलेचे नाव असून, महापे शिळफाटा मार्गालगत पारधीपाडा परिसरात तिच्यावर कारवाई करण्यात आली. त्या ठिकाणी ती गांजा विकत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष १ला माहिती मिळाली होती. त्यानुसार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक आबासाहेब पाटील यांच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली.

# नेरूळमध्ये बसथांब्यासमोर दुचाकींचे अवैध पार्किंग

## प्रवाशांना मनस्ताप

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ रेल्वेस्थानक समोरील बस थांब्यावर दुचाकींचे अवैध पार्किंग केले जात आहे. त्यामुळे प्रवाशांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. नेरूळ रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांच्या सुविधेसाठी बस थांबा उभारण्यात आला आहे, मात्र बस थांब्याच्या दोन्ही बाजूस दुचाकी वाहनचालक आपल्या गाड्या पार्क करतात.

या ठिकाणावरून नवी मुंबई महापालिका परिवहन विभागाच्या बस क्रमांक २२, १८, १४, २०, तसेच बेस्ट उपक्रमाच्या बस क्रमांक ५०२ ये-जा करीत असतात. या ठिकाणी रेल्वे प्रवाशांसह इतर नागरिक या बस थांब्याचा वापर करतात. त्यामुळे दिवसभरात स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी असते, मात्र बस स्थानकासमोर पार्क करण्यात आलेल्या दुचाकींमुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. शिवाय थांब्यावर बस उभी करण्यासाठी परिवहनच्या चालकांना तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे या दुचाकीचालकांवर कारवाई करण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## निवडक

### वाशी खाडीपुलावर मृत अर्भक

**नवी मुंबई :** वाशीतील जुन्या खाडीपुलावर मृतावस्थेत स्त्री अर्भक आढळले आहे. पुलावरील विद्युत खांबांची दुरुस्ती सुरू असताना कर्मचाऱ्यांच्या निदर्शनात हा प्रकार आला. शनिवारी सकाळी पुलावरील विद्युत खांबांच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. या वेळी कर्मचारी एका खांबाजवळ गेले असता त्याखाली कपड्यात गुंडाळलेले अर्भक दिसून आले. याबाबत त्यांनी पोलिसांना कळवून ते अर्भक रुग्णालयात नेले. या वेळी डॉक्टरांनी ते स्त्रीजातीचे नवजात अर्भक असून मृतावस्थेत असल्याचे सांगितले. अज्ञाताविरोधात वाशी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू असल्याचे सांगितले.

### स्व. इंदिरा गांधींना अभिवादन

**नवी मुंबई :** भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीदिनी नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रीय एकात्मतेची सामुहिक शपथ ग्रहण केली. या वेळी समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, दत्ता काळे, सुचिता गीध, एनयूएचएम शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. श्रीदेवी गर्गे लवार आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# नायजेरियन नागरिकाची सुरक्षारक्षकाला मारहाण

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुतळ्याच्या ठिकाणी नेमलेल्या सुरक्षारक्षकाला मारहाण झाल्याची घटना घडली आहे. नायजेरियन व्यक्तीने हा प्रकार केला असून, त्याच्याकडून पुतळ्याच्या ठिकाणी व लगतच्या शिल्प कक्षात घुसण्याचा प्रयत्न सुरू होता.

वाशीतील चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा व चौकालगत असलेले शिल्प केंद्रदेखील नागरिकांचे आकर्षण ठरत आहे. यामुळे त्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेमार्फत सुरक्षारक्षक नेमलेला आहे. त्यानुसार भगवान सोनारे हे रात्रपाळी करत होते.

मध्यरात्री दोनच्या सुमारास त्या ठिकाणी आलेल्या एका नायझेरियन व्यक्तीने पुतळा असलेल्या ठिकाणी तसेच शिल्प असलेल्या ठिकाणी घुसण्याचा प्रयत्न केला, परंतु सुरक्षारक्षकाने त्याला हटकल्याने तो रात्रभर त्याच ठिकाणी बसून होता. सकाळी सुरक्षारक्षक सोनारे यांना नायझेरियनने शिवीगाळ करत ठोस्याने मारहाण केली.

होणारी मारहाण पाहून एकाने पोलिसांना कळवले असता वाशी पोलिसांनी घटनस्थळावरून नायझेरियनला ताब्यात घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल केला असून, पोलिसांचा तपास सुरू आहे.

# मतदान केंद्राजवळ संशयास्पद राऊटर आणि लॅपटॉपमुळे खळबळ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळमधील शिवाजीनगर येथील मतदान केंद्राजवळ उभ्या असलेल्या एका कारमध्ये काही इंटरनेट राऊटर आणि लॅपटॉप संशयास्पदरीत्या आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेले राऊटर व लॅपटॉप व मोबाईल फोनमधील चिप्सच्या तपासणीचे काम करण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या कारमधून कुठल्याही प्रकारची संशयास्पद कृती केली जात नसल्याचे व नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

मतदानाला सुरुवात झाल्यानंतर बुधवारी सकाळी पावणे दहा वाजण्याच्या सुमारास नेरुळच्या शिवाजीनगर परिसरामध्ये सहा ते सात राऊटर व एक लॅपटॉप व इतर साहित्य असलेली कार संशयास्पदरीत्या फिरताना नागरिकांच्या निदर्शनास आली. त्यामुळे काही नागरिकांनी या कारचे व राऊटरचे फोटो, व्हिडिओ काढून ते व्हायरल केले. त्यामुळे या कारमधील इंटरनेट राऊटरद्वारे मतदान केंद्र व त्यातील मशीन हॅक करण्यात येत असल्याची अफवा पसरली. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी तत्काळ ही कार ताब्यात घेतली.

त्यानंतर या कारची व त्यातील इंटरनेट राऊटर व लॅपटॉपवरून सुरू असलेल्या कामकाजाची माहिती घेतली. या तपासणीत ही कार मार्कोस टेक्नॉलॉजी प्रा. लि. या कंपनीची असल्याचे व या कंपनीकडून मोबाईल फोनमधील चिप्सच्या तपासणीचे नियमित काम करण्यात येत असल्याचे आढळून आले.

### अफवांवर विश्वास ठेवू नका!

मोबाईल फोनमधील चिप्स तपासणीचे काम करण्यासाठी सदर कंपनीला संपूर्ण देशासह परदेशातसुद्धा परवानगी असल्याचे पोलिस तपासणीत आढळून आले. त्यामुळे या कारमधील इंटरनेट राऊटरद्वारे मतदान केंद्र हॅक करण्यात येत असल्याची बाब खोटी असून ती अफवा असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. संबंधित कंपन्यांच्या सर्व परवानग्या तपासण्यात आल्या असून त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार करण्यात येत नसल्याचे आढळून आल्याचेदेखील त्यांनी सांगितले.

# सोसायटीच्या आवारात १७ हजारांच्या बेवारस नोटा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू असताना घणसोली सेक्टर-७ मधील गणेश कृपा सोसायटीमध्ये मंगळवारी (दि. १९) मध्यरात्री उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी बेकायदा जमाव जमवून आचारसंहितेचा भंग केल्याने रबाळे पोलिसांनी १० ते १५ कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



या वेळी निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने या बिल्डिंगच्या आवाराची तपासणी केली असता, या बिल्डिंगच्या पाठीमागील भागात दोन ठिकाणी ५०० रुपये दराच्या १७ हजारांच्या नोटा बेवारस स्थितीत पडल्याचे आढळून आले आहे. या नोटा पोलिसांनी जप्त करत पुढील तपासाला सुरुवात केली आहे.


घणसोली सेक्टर-७ मधील सिम्पलेक्स वसाहतीतील गणेश कृपा सोसायटीत मंगळवारी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास निवडणुकीच्या अनुषंगाने पैसेवाटप करण्यात येत असल्याची माहिती ऐरोली विधानसभा मतदारसंघातील भरारी पथकाला मिळाली होती. या महितीच्या आधारे भरारी पथकाने गणेश कृपा सोसायटीत धाव घेतली. या वेळी संदीप लटांबळे, सुशांत जाधव, नवनाथ कोंढाळकर हे तिघे तिसऱ्या मजल्यावर संशयास्पदरीत्या आढळून आल्याने पोलिसांनी तिघांची झडती घेतली, मात्र त्यांच्याजवळ काहीच सापडले नाही. त्यामुळे भरारी पथकाने संपूर्ण इमारतीच्या आवाराची तपासणी केली.

या वेळी बिल्डिंगच्या पाठीमागील बाजूस १७ हजारांच्या ५०० रुपयांच्या ३४ नोटा बेवारसस्थितीत पडल्याचे आढळून आले. या नोटा भरारी पथकाने जप्त केल्या असून भरारी पथकाने आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी संदीप लटांबळे, सुशांत जाधव, नवनाथ कोंढाळकर यांच्यासह १५ कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# 'ओएलएक्स'वरून वाहन खरेदी महागात

**नवी मुंबई : बातमीदार**

ओएलएक्सवरून चारचाकी कार विकत घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या तरुणाला एका भामट्याने ६५ हजार रुपयांना गंडा घालून त्याला कार न देता त्याची फसवणूक करून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. वाशी पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.




या प्रकरणात फसवणूक झालेला रोहित वर्मा (वय २३) हा तरुण मुंबईतील शिवडी भागात राहण्यास आहे. रोहितला सेकंडहँड कार खरेदी करायची असल्याने त्याने ओएलएक्सवर कारचा शोध घेतला. या वेळी त्याला ओएलएक्सवर विक्रीसाठी असलेली हुंडाई आय-१० कार आवडल्याने त्याने कारविक्रेता राहिल सय्यद याला संपर्क साधला. दुसऱ्या दिवशी रोहित वाशी सेक्टर-१ मध्ये आल्यानंतर आरोपी राहिल सय्यदने त्याला कार दाखवली. कार रोहित व त्याच्या मित्रांना आवडल्याने त्यांनी ६५ हजार रुपयांमध्ये विकत घेण्याचा व्यवहार ठरवला. त्यानंतर रोहितने त्याच्या मोबाईलवरून आरोपी राहिल सय्यद याला पाच हजार रुपये टोकन रक्कम पाठवून दिली.

यानंतर दुसऱ्या दिवशी सायंकाळी रोहित आपल्या मित्रांसह कार घेण्यासाठी आल्यानंतर त्याने राहिलच्या मोबाईल फोनवर ६० हजार रुपये पाठवून दिले. त्यानंतर राहिल सय्यद याने बाजूच्या इमारतीत राहत असल्याचे सांगून घरातून गाडीची मूळ कागदपत्रे व चावी घेऊन येण्याचा बहाणा करून त्या ठिकाणावरून पलायन केले.

# जुईनगरला स्वतंत्र वॉर्डची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका हद्दीतील जुईनगर हा प्रभाग प्रशासकीय कामकाजात नेरूळ आणि सानपाडा विभागात मोडतो. जुईनगरला स्वतंत्र पिनकोडदेखील नाही. त्यामुळे जुईनगरला स्वतंत्र वॉर्ड करावे, अशी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष ॲड. नवीन प्रतापे यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

जुईनगरमधील वसाहतीची संख्या आजमितीला शेकडोंच्या वर आहे. या विभागात एकूण चार सेक्टरचा अंतर्भाव आहे, मात्र प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने जुईनगर सेक्टर २३ हा नेरूळ विभागात मोडत असून त्याचा पिन कोड ४००७०५ हा आहे, तर सेक्टर २४ आणि २५ हा प्रशासकीय कामकाजात सानपाडा विभागात येतो. सेक्टर २२ रेल्वे कॉलनी हा सानपाडा कारशेड म्हणून ओळखला जातो. त्यामुळे येथील काही सेक्टरमधील नागरिकांना प्रशासकीय कामकाजाकरिता सानपाडा, तर काहींना नेरूळमध्ये धाव घ्यावी लागते. त्यामुळे जुईनगरवासीयांना स्वतंत्र ओळख द्यावी, अशी मागणी प्रतापे यांनी केली आहे.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयाचे विद्यार्थी नृत्य स्पर्धेत अव्वल

**नवी मुंबई : बातमीदार**

लायन्स क्लब ऑफ न्यू बॉम्बे वाशी यांच्या अंतर्गत कॅन्सर रुग्णांसाठी आर्थिक मदतीसाठी नवरंग आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक नृत्य स्पर्धा हा चॅरिटेबल इव्हेंट दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ घेण्यात आला, ज्यामध्ये एफ.जी. नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.



स्पर्धेमध्ये एफ.जी. नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी येथील स्थानिक आगरी कोळी समाजाची संस्कृती व परंपरा आपल्या कला अविष्कारातून सुबकरीत्या सादर केली. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट नृत्याला व सादरीकरणाला नाट्यगृहातील उपस्थित सर्वांनी उदंड प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्यातून आगरी कोळी समाजात साजरे केले जाणारे नारळी पौर्णिमा व त्या समाजातील लग्नाच्या अवतीभवती असणाऱ्या वेगवेगळ्या संस्कृती व परंपरेचे दर्शन घडविले. परीक्षकांनी देखील विद्यार्थ्यांचे त्यांच्या लोक नृत्य, वेशभूषा, प्रेक्षक प्रतिबद्धता, रंगमंचाचा पुरेपूर वापर ,वापरल्या गेलेल्या पारंपारिक प्रॉप्स याबद्दल प्रशंसा केली.

या नृत्य स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे वाणिज्य शाखेतील द्वितीय वर्षाचे आदिती खोत, हर्षदा मुद्गल, विधी राक्षे तर प्रथम वर्षाची पूर्व पाटील व तृतीय वर्षाचा साहिल कांबळे, त्याचबरोबर द्वितीय वर्ष कला शाखेचे साहिल मुलिक, दिशा सावंत, आलिशा मेल, शुभम गायकवाड हे दहा विद्यार्थी सहभागी झाले होते. महाविद्यालयाला ट्रॉफी व दहा हजार रोख रक्कम प्रथम पारितोषिक म्हणून मिळाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य श्री प्रताप महाडिक सर यांनी मिळालेल्या यशाबद्दल समाधान व्यक्त करीत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात सत्कार केला. त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली व विद्यार्थ्यांनी अशा समाज उपयोगी उपक्रमांमध्ये आपल्या शैक्षणिक प्रगती बरोबरच नेहमी सहभाग दर्शवावा असा सल्ला दिला. त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीदेखील सर्व विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नेरूळमध्ये दहा फूट अजगर जेरबंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अग्निशमन दलाच्या जवानांनी नेरूळ येथील मोकळ्या मैदानावर आढळून आलेल्या दहा फूट अजगराला पकडून वनखात्याच्या स्वाधीन केले आहे.

नेरूळ सेक्टर १९ ए येथील आरटीओ कार्यालयाजवळ असलेल्या मोकळ्या मैदानात दहा फूट लांबीचा अजगर आढळून आला. या वेळी परिसरातील नागरिकांनी तत्काळ अग्निशमन दलाला फोन कॉल केला. त्यानुसार अग्निशमन जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत अजगराला पकडण्याचे शर्थीचे प्रयत्न करून त्याला जेरबंद केले.

नवी मुंबई महापालिका नेरूळ अग्निशमन केंद्र येथील अग्नी प्रणेता श्रीकांत सावंत, अग्निशामक सुनील गावित, अग्निशामक मिलिंद पाटील, वाहनचालक राजेश भोईर यांनी या अजगराला नवी मुंबई पामबीच रोड येथील वन खात्याच्या जंगलात सोडून दिले. यामध्ये कोणीही जखमी झाले नसल्याचे सांगण्यात आले.

# अनधिकृत दर्ग्यावर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

कोल्ही कोपर, पारगाव येथील डोंगरावरील अनधिकृत दर्ग्यावर कारवाई करून बांधकाम पाडण्याचे काम सिडकोने हाती घेतले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हे अनधिकृत बांधकाम पाडण्याची मागणी केली जात होती.



नवी मुंबई विमानतळाच्या बाजूला कोल्ही कोपर, पारगाव येथील डोंगरावर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात बांधकाम केलेले आहे. सुरुवातीला या ठिकाणी छोट्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केले होते, मात्र काही महिन्यांनंतर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पक्के बांधकाम करून अनधिकृत बांधकामे करण्यात आली. त्या ठिकाणाहून विमानतळाच्या सर्व ॲक्टिव्हिटीज वर निगराणी ठेवणे अगदी सहज आणि सोपे असल्याने या नवी मुंबई विमानतळाच्या सुरक्षेस आणि सुरक्षिततेला धोका पोहचण्याची शक्यता असल्याच्या अनेक तक्रारी सिडको, पोलिसांकडे करण्यात आल्या होत्या. हे बांधकाम निष्कासित करण्यात यावे आणि या बांधकामास दुजोरा देणाऱ्या सरकारी यंत्रणांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती.

याबाबत सिडकोने या ठिकाणची स्थळ पाहणी केली होती आणि अनधिकृत बांधकाम धारकाला नोटीसदेखील देण्यात आली होती. २१ नोव्हेंबरपासून जेसीबी, पोकलेनच्या साह्याने या ठिकाणचे अनधिकृत बांधकाम पाडण्याचे काम सुरू आहे. या वेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. हे अनधिकृत बांधकाम नवी मुंबई विमानतळाला बाधा आणू शकते तसेच ती राष्ट्रीय सुरक्षासाठी धोकादायक असून त्यावर कारवाईची मागणी पक्ष आणि संघटनांनी केली होती. त्यानुसार या ठिकाणी कारवाईला सुरुवात झाली आहे.





खारघर : विधानसभा निवडणुकीत पनवेल मतदारसंघामध्ये ७० वर्षीय संवरना जगदिश शर्मा आणि ६८ वर्षीय बलजीत सिंह कंवर या कोमामधून बाहेर आलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी मतदान केले. त्यांनी रघुनाथ विहार येथील मतदान केंद्रावर व्हीलचेअरवर येऊन आपला मतदानाचा हक्क बजावला.

# माथेरानमध्ये शांततेत मतदान

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये विधानसभेचे शांततेत मतदान पार पडले. या वेळी एकूण २९२३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. माथेरान शहरात ४०२४ मतदार आहेत. येथे एकूण ७२:६३% मतदान झाले.



माथेरान शहरात विधानसभेच्या झालेल्या मतदानाच्या वेळी अपक्ष उमेदवार सुधाकर घारे विद्यमान आमदार महेंद्र थोरवे व उबाठा शिवसेना गटाचे नितीन सावंत या तिन्ही उमेदवारांच्या बूथवर प्रचंड प्रमाणात गर्दी दिसून येत होती, परंतु जसजसी वेळ पुढे गेली त्यानंतर सुधाकर घारे व महेंद्र थोरवे यांच्यातच मुख्य लढत असल्याचे चित्र माथेरानमध्ये पहावयास मिळत होते. त्यामुळेच येथील वातावरणामध्ये थोडा तणाव दिसून आला, मात्र पोलिसांच्या सातत्याने नागरिकांना सूचना व गस्तीमुळे येथील मतदान शांततेत पार पडले.

या वेळी माथेरानमध्ये येथून कायमस्वरूपी बाहेर व्यवसाय किंवा कामानिमित्त गेलेले अथवा जी मंडळी केवळ मतदानाचा हक्क बजावण्यासाठी दरवेळेस हजेरी लावतात असेच मतदार आल्याने या ठिकाणी एखाद्या जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. मतदानाचा टक्का वाढल्यामुळे त्याचा फायदा कोण घेणार याच्या चर्चा आता रंगू लागल्या आहेत.

विधानसभेच्या निवडणुकीत महाआघाडीतील घटक पक्षांनी आघाडीचा धर्म न पाळता अपक्ष उमेदवाराचे काम बजावले, ही बाब मतदारांना प्रकर्षाने जाणवली त्यामुळे नेमके राजकरण काय शिजते याचा उलगडा मतदारांना झाला नाही.

जी प्रक्रिया स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पहावयास मिळते ती प्रक्रिया या विधानसभेच्या निवडणुकीत समस्त माथेरानकरांना अनुभवायला मिळाली. महाआघाडीच्या काही प्रमुख नेत्यांनी पंधरा दिवस अगोदर पासूनच अपक्ष उमेदवाराला मताधिक्य मिळवून देण्यासाठी माथेरान बाहेर राहणाऱ्या मतदारांशी संपर्क करण्यास सुरुवात केली होती. त्याप्रमाणे ते मतदार वेळेत हजरसुद्धा झाले. जवळपास बहुतांश मतदारांनी तिन्ही उमेदवारांच्या निवडणूक निधीचा पुरेपूर लाभ घेतल्याचे चित्र पहायला मिळाले.

# माणगावमधील बोंडशेत केंद्रावर मतदानयंत्रात बिघाड

## यंत्रदुरूस्ती पथकाच्या कार्यवाहीनंतर प्रक्रिया पूर्ववत

**माणगाव : प्रतिनिधी**

महाड विधानसभा मतदारसंघातील माणगाव तालुक्यामधील बोंडशेत येथील मतदान केंद्रावर मतदान सुरू झाल्यानंतर सकाळच्या सत्रात ७ ते ९ वाजेपर्यंत ९.८२ टक्के मतदान सुरळीत झाले. त्यानंतर सकाळी ९.०५ मिनिटांनी मतदान यंत्रात अचानक बिघाड होऊन बीझी लॅम्प दिसत नसल्यामुळे मतदान थांबले.

या मतदान केंद्राचे बूथ प्रमुख सुधीर पाटील यांनी तातडीने संबंधित निवडणूक अधिकारी यांना कळविले. यानंतर तातडीने यंत्र दुरुस्ती पथक बोंडशेत येथील मतदान केंद्रावर पोहचले. त्यानंतर मतदान सकाळी ९.४५ मिनिटांनी पूर्ववत सुरू झाले.





बोंडशेत मतदान केंद्र वगळता सर्वत्र उत्साहात व शांततेत मतदान सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पार पडले. महाड विधानसभा मतदारसंघातील माणगाव पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या गावात व केंद्रावर शांततेत मतदान पार पडले. सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रांगा लावल्या होत्या.

# माया गेल्यावर बोधाचा जन्म होतो -हभप संदीपमहाराज

**चौक : प्रतिनिधी**

माणसाच्या आयुष्यातील माया निघून गेली की, बोधाचा जन्म होतो व त्यामुळेच माणसाच्या जीवनाचा उद्धार होतो, असे परमार्थिक विचार ज्येष्ठ कीर्तनकार हभप संदीपमहाराज यादव यांनी केले.



श्री भागवत धर्माचार वारकरी सांप्रदाय सामुदायिक मंडळ पालखी सोहळा भिवंडी (ठाणे) यांच्या पायी आळंदी वारीचे १०१वे वर्ष. ही पायी वारी खालापूर तालुक्यातील वावंढळवाडी येथील काईनकर परिवारात एक दिवसाच्या मुक्कामाला येते. त्यानिमित्ताने कीर्तन आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी संदीपमहाराज बोलत होते.

या वेळी हभप कमलाकर काईनकर, हभप रमेश महाडिक, हभप अरुण दळवी यांच्यासह भिवंडी, ठाणे, कल्याणसह रायगड जिल्ह्यातील वारकरी उपस्थित होते.


# रेवदंडा आगरकोट किल्ल्यातील सातखणी बुरूज पर्यटकांचे आकर्षण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील आगरकोट किल्ला ऐतिहासीक काळात पोतुर्गीजांचा अभेद्य बालेकिल्ला होता. आगरकोट सभोवातलची समुद्र तटबंदी आणि डोमिनिकन चर्च, फ्रान्सिस्कन चर्च, चौकोनी बुरूज आणि सातखणी बुरूज पाहण्यासाठी पर्यटक व पै-पाहूणे यांची नेहमी गर्दी असते.

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथे आगरकोट किल्ला आहे. या किल्ल्याच्या वायव्येकडील बुरूजाजवळील लहान दरवाजाच्या आग्येस ४५.७२ मीटरवर तटबंदीच्या पश्चिमेकडील भिंतीस भगदाड पडले आहे. त्या समोर १५३४च्या सुमारास बांधलेल्या फ्रान्सिस्कन इमातीच्या मध्यभागी ६.०९ मीटर चौकोनी आकाराचा सातखणी बुरूजाचा भिंतीच्या सांगाडा पहावयास मिळतो. पूर्वी त्याची उंची २९.२६ मीटर इतकी नमूद केलेली असली तरी वरच्या बाजूने भिंती पडल्यामुळे उंची कमी झालेली आहे. बुरूजालगत सर्व इमारती भिंती पूर्णपणे पडलेल्या असून आजूबाजूस अर्धवट भिंतीचे अवशेष दिसतात.

समुद्रमार्गे शत्रुने हल्ला केल्यास शत्रूवर करडी नजर ठेवण्यासाठी हा सातखणी बुरूजाची बांधणी झाली असावी असे म्हटले जाते. या सातखणी बुरूजाच्या वरील बाजूकडून दूरवर समुद्र किनारी नजर जात असल्याने शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवण्यास या सातखणी बुरूजाचा उपयोग केला जात असे. सध्या रेवदंडा मोठ्या बंदरकडे जाणाऱ्या मुख्यः रस्त्यावरून सातखणी बुरूजाकडे जाण्यासाठी मार्ग आहे. या ठिकाणी पर्यटक व पै-पाहूणे यांची नित्याची रेलचेल असते. आता पर्यटन हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढण्याची चिन्हे आहेत.



# विधानसभा निवडणुकीसाठी ग्रामीण भागात भरघोस मतदान























**अलिबाग : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत रायगड जिल्ह्यात भरघोस मतदान झाले. पनवेल व श्रीवर्धन वगळता उरण, कर्जत, पेण, अलिबाग, महाड या मतदारसंघात ७० टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली. जिल्ह्यात एकूण ७३ उमेदवार निवडणूक रिंगणात होते, तर एकूण २४ लाख ८८ हजार ७८८ मतदार होते. जिल्ह्यात २८२० मतदान केंद्रांवर मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. किरकोळ प्रकार वगळता मतदानाच्या वेळी कोणाताही अनुचित प्रकार घडला नाही. मतदान शांततेत पार पडले. मतदानासाठी तरुणाई आघाडीवर होती. नवमतदारांमध्ये अधिक उत्साह दिसत होता, तर अनेक ज्येष्ठ नागरिकांनीही मतदान करीत लोकशाहीचा उत्सव साजरा केला. मतदानाच्या दिवशी गावोगावी चाकरमानी पोहचले होते. त्यांची येण्या-जाण्याची तसेच खाण्यापिण्याची खास व्यवस्था करण्यात आली होती. मतदान करून चाकरमानी माघारी परतले. आता सर्वांचे लक्ष २३ नोव्हेंबरला होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे.**

# टीम इंडियाची प्लेइंग ११ ठरली

## पर्थ कसोटीआधी कर्णधार जसप्रीत बुमराहचा खुलासा

**पर्थ : वृत्तसंस्था**

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी चाहते खूप उत्सुक आहेत. टीम इंडियाचे खेळाडू पर्थमध्ये आठवडाभरापासून सराव करत आहेत. या मालिकेतील पहिला सामना पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर होणार आहे. या सामन्यासाठी भारतीय संघ पूर्णपणे सज्ज झाला आहे.

सामन्याच्या एक दिवस आधी भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांच्या कर्णधारांनी पत्रकार परिषद घेतली आणि त्यादरम्यान दोघांनी अनेक मोठे खुलासे केले. मालिकेतील



पहिल्या सामन्यात टीम इंडियाची धुरा कर्णधार जसप्रीत बुमराहच्या हाती आहे. रोहित शर्मा नुकताच दुसऱ्यांदा बाबा झाला आहे. त्यामुळे तो ऑस्ट्रेलियाला जाऊ शकला नाही.

भारतीय क्रिकेट संघाच्या प्लेइंग ११बद्दल बोलताना जसप्रीत बुमराहला पत्रकार परिषदेदरम्यान विचारण्यात आले की, मालिकेच्या पहिल्या सामन्यात टीम इंडियाचा प्लेइंग ११ कसा असेल? यावर बुमराहने हसतमुखाने उत्तर दिले आणि सांगितले की, टीम इंडियाची प्लेइंग ११ ठरली आहे, मात्र याचा खुलासा तो २२ नोव्हेंबरला सामन्याच्या दिवशी करणार आहे. टीम इंडियाचे काही स्टार खेळाडू मालिकेतील पहिल्या सामन्याला मुकणार आहेत, ज्यामध्ये रोहित शर्माशिवाय शुबमन गिलचेही नाव आहे, मात्र बुमराहने याबाबत कोणतेही विशेष अपडेट दिलेले नाही.

मालिकेच्या पहिल्या सामन्यात काही खेळाडू टीम इंडियासाठी पदार्पणही करू शकतात. त्या खेळाडूंमध्ये नितीश कुमार रेड्डी, हर्षित राणा यांच्या नावांचा समावेश होऊ शकतो. बुमराहने पत्रकार परिषदेत सांगितले की, टीम इंडियाच्या युवा खेळाडूंनी या मालिकेदरम्यान मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्यात अशी माझी इच्छा आहे.

बुमराहने असेही सांगितले की, या मालिकेतील पहिल्या सामन्यात तो कर्णधार होईल हे माहीत नव्हते, पण ऑस्ट्रेलियात आल्यानंतर संघ व्यवस्थापन आणि प्रशिक्षकाने सांगितले की, रोहित शर्मा पहिल्या सामन्याला मुकणार आहे. अशा स्थितीत त्याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात येत आहे.

## शुबमन पहिली कसोटी खेळणार?

**पर्थ : वृत्तसंस्था**



भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना २२ नोव्हेंबरला पर्थमध्ये खेळवला जाणार आहे, ज्यामध्ये शुबमन गिल अंगठ्याच्या दुखापतीमुळे बाहेर झाल्याचे म्हटले जात आहे, पण आता गिलबाबत ताजे अपडेट समोर आले आहे.

पहिल्या कसोटी सामन्यात शुबमन गिल दुखापतीमुळे खेळणार नसल्याची माहिती समोर आली होती. सराव सामन्यादरम्यान गिलला दुखापत झाली आणि त्याला मैदान सोडावे लागले. त्यानंतर गिल पर्थ कसोटीत खेळू शकणार नसल्याचे वृत्त समोर आले होते. आता गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल पत्रकार परिषदेत म्हणाला, तो दिवसागणिक दुखापतीतून बरा होत आहे. आम्ही कसोटीच्या दिवशी सकाळी निर्णय घेऊ. सराव सामन्यादरम्यान त्याने चांगली कामगिरी केली. त्यामुळे तो यशस्वी होईल, अशी आशा आहे.

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये शुबमन गिलचे खेळणे टीम इंडियासाठी खूप महत्त्वाचे असणार आहे. गिलला ऑस्ट्रेलियात खेळण्याचाही चांगला अनुभव आहे. २०२०-२१मध्ये खेळल्या गेलेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्येही तो टीम इंडियाचा भाग होता. या मालिकेदरम्यान त्याने चांगली कामगिरी केली होती. त्या वेळी टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाला २-१ने पराभूत केले होते.

**देवदत्त पड्डिकल पर्याय**

ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या सामन्यासाठी भारतीय अ संघात देवदत्त पड्डिकलची निवड करण्यात आली होती. या सामन्यांनंतर पड्डिकलला ऑस्ट्रेलियातच थांबवण्यात आले आहे. गिलच्या दुखापतीनंतर पर्थ कसोटीत गिलच्या जागी देवदत्त पड्डिकलला तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याची संधी मिळू शकते, असे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे आता भारतीय संघ पहिल्या कसोटीपूर्वी काय निर्णय घेणार आणि संघाची प्लेईंग इलेव्हन कशी असणार याची सर्वांनाच उत्सुकता आहे.

## खलील अहमदच्या जागी यश दयालला संधी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीपूर्वी भारतीय संघ ऑस्ट्रेलियात सराव करत असताना संघाला एकामागून एक खेळाडूंच्या दुखापतींचा सामना करावा लागत आहे. आधी केएल राहुल मग शुबमन गिल आणि आता भारतीय संघातील खलील अहमद खेळाडू दुखापतीमुळे मायदेशी परतला आहे. त्याच्या जागी नवा खेळाडू यश दयाल भारतीय संघात दाखल झाला आहे.

या मालिकेसाठी बीसीसीआयने एकूण १८ खेळाडूंचा भारतीय संघात समावेश केला आहे. त्याचबरोबर तीन खेळाडू राखीव म्हणून ऑस्ट्रेलियाला गेले आहेत. ऑस्ट्रेलियाविरूद्धची बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी सुरू होण्यापूर्वीच वेगवान गोलंदाज खलील अहमदला दुखापत झाली आहे. या मालिकेसाठी त्याची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली होती, मात्र दुखापतीमुळे तो भारतात परतला आहे.

खलीलला दुखापत झाल्याने तो नेटमध्ये गोलंदाजी करू शकला नाही. त्यामुळे वैद्यकीय पथकाने त्याला विश्रांतीचा सल्ला दिला, त्यानंतर त्याला भारतात परत पाठवण्यात आले. आयपीएल लिलावापूर्वी खलील सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धा खेळणार की नाही हे अद्याप ठरलेले नाही, कारण दिल्ली कॅपिटल्सने त्याला रिलीज केले आहे.

खलील अहमदच्या जागी डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयालचा भारताच्या राखीव खेळाडूंमध्ये समावेश करण्यात आला आहे, ज्याच्या गोलंदाजीवर आयपीएलमध्ये रिंकू सिंगने अखेरच्या षटकात पाच चेंडूत पाच षटकार मारून विजयश्री खेचून आणली होती. यश नुकत्याच झालेल्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर भारतीय टी-२० संघाचा भाग होता, मात्र त्याला खेळण्याची संधी मिळाली नाही. जोहान्सबर्गहून तो थेट पर्थला पोहचला आहे.

बीसीसीआयच्या एका सूत्राने पीटीआयला ही माहिती दिली, भारतीय संघाला सरावासाठी मिचेल स्टार्कसारख्या गोलंदाजी करणाऱ्या गोलंदाजाची गरज असल्याने हा पर्याय आहे. दयाल भारत अ संघाकडून कसोटी सामना खेळणार होता, पण त्याला दक्षिण आफ्रिकेत पाठवण्यात आले.

## वॉर्नरचा वारसा नॅथन मॅकस्विनी चालवणार पुढे

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर करंडकाचा ज्वर शिगेला पोहचला आहे. यंदा या मालिकेत ऑस्ट्रेलियाच्या वतीने धडाकेबाज सलामीवीर डेव्हिड वॉर्नर खेळताना दिसणार नाही. वॉर्नरने निवृत्ती स्वीकारल्यामुळे ऑस्ट्रेलियाच्या निवड समितीला उस्मान ख्वाजाचा साथीदार कोण याचा शोध घ्यावा लागला. अनेक नावांमधून निवड समितीने नॅथन मॅकस्विनीच्या नावाला पसंती दिली आहे.

२५ वर्षीय मॅकस्विनी ऑस्ट्रेलियातल्या साऊथ ऑस्ट्रेलिया संघाकडून खेळतो. बिग बॅश स्पर्धेत त्याने मेलबर्न रेनेगेड्स आणि ब्रिस्बेन हिट संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. २०२३-२४ हंगामात मॅकस्विनीने ४०.९४च्या सरीने धावा फटकावल्या.

## राज्यस्तरीय सब ज्युनिअर तायक्वांडो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जळगाव येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर तायक्वांडो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर करण्यात आला आहे. रायगड तायक्वांडो असोसिएशनमार्फत रायगड तायक्वांडो असोसिएशनचे प्रमुख शिक्षक व सचिव सुभाष पाटील व अनिल म्हात्रे यांनी हा संघ जाहीर केला.

या राज्यस्तरीय स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू, भारतातील शिखर संस्था तायक्वांडो ऑफ फेडरेशन इंडियाच्या वतीने २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर रोजी हरियाणातील पंचकुला येथे होणाऱ्या राष्ट्रीय सब ज्युनिअर तायक्वांडो स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.

पूमसे प्रशिक्षक म्हणून मच्छिंद्र मुंडे, राष्ट्रीय पंच तेजस माळी व प्रशांत घरत यांची पंच म्हणून निवड झाली आहे.

**संघ पुढीलप्रमाणे**

मुले : केशव झा, मीतांशू पाटील, प्रियांशु पाटील, आयांश खाणे, आयुष ठाकुर, स्वर्ण भोईर, नील पाटील, हर्ष नित्तुरकर, साक्ष पाटील, साईराज राठोड, विश्व वेलणकर, अक्षत जाधव, आदित्य जैसवाल, नील पालेकर, आयु शुक्ला, प्रशिक्षक निलेश जाधव, व्यवस्थापक निर्मिती दत्ता.

मुली : ओवी प्रभु, रिद्धी गोवस्कर, आरोही खाणे, आरोही जांभुळकर, गार्गी पाटील, आम्रता सिंग, आद्या प्रशांत घरत, स्वरा तरडे, दिद्रीप्ता पटनायक, काव्या देसाई, सानवी शुक्ला, ईशिता पाधी, परी शुक्ला, स्वाती जयस्वाल, धनिष्का पाटील, स्वरा मुळे, आराध्या पाटील, प्रशिक्षिक सोनु वडगिर, व्यवस्थापक राधिका नारायणन.

## हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी पर्थ कसोटीत करणार पदार्पण?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांत पाच सामन्यांच्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीला २२ नोव्हेंबर म्हणजे शुक्रवारपासून पर्थ येथे सुरुवात होत आहे. या सामन्यासाठी दोन्ही संघ जोरदार तयारी करत आहेत. पर्थ कसोटीत हर्षित राणा आणि नितीश कुमार रेड्डी भारतासाठी कसोटी पदार्पण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नितीशचा आंध्र प्रदेशचा खेळाडू आहे. तो बॉलिंग ऑलराऊंडर आहे. शार्दूल ठाकूरने गेल्या सीरिजला जे काम केले ते नितीशने करावे अशी अपेक्षा आहे. नितीश सनरायझर्स सनरायझर्ससाठी चांगले खेळला. त्यांनी त्याला रिटेनही केला आहे. आयपीएल २०२४मध्ये त्याने हैदराबादकडून तुफानी फलंदाजी करताना अनेक विक्रम मोडीत काढले होते. ज्यामुळे हैदराबाद संघाने त्याला आयपीएल २०२४साठीसुद्धा रिटेन केले आहे.





नितीशला आपली क्षमता सिद्ध करण्याची ही मोठी संधी असेल. नितीशने आपल्या कारकिर्दीत आतापर्यंत २० प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. या कालावधीत त्याने २०.२२च्या सरासरीने ६२७ धावा केल्या आहेत. यामध्ये एक शतक आणि दोन अर्धशतकांचा समावेश आहे. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५४ विकेट्सही घेतल्या आहेत.

दिल्लीचा वेगवान गोलंदाज हर्षित राणा, ज्याला आयपीएल २०२५च्या लिलावापूर्वी कोलकाता नाईट रायडर्सने रिटेन केले आहे. तो आता पर्थमध्ये कसोटी पदार्पण करू शकतो. बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, पर्थमधील मॅच सिम्युलेशनमध्ये हर्षित खूप प्रभावी होता. विशेषतः त्याच्या बाउन्सरने सर्वांना प्रभावित केले आहे. तो न्यूझीलंडविरुद्ध मुंबईत पदार्पण करेल, अशी बरीच चर्चा होती, पण तसे झाले नाही. हर्षितसाठी केकेआरचे दोन हंगाम चांगले गेले आहे. आताचा टीम इंडियाचा कोच गौतम गंभीर त्या वेळी केकेआरचा मेन्टॉर होता, ज्याचा त्याला फायदा झाला आहे.

हर्षितने आतापर्यंत एकूण १० प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने ४३ विकेट्स घेतल्या आहेत. या काळात त्याने एक रणजी सामना खेळला आहे, जो तो आसामविरुद्ध खेळला होता. त्या सामन्यात त्याने पाच विकेट्स घेत अर्धशतकही झळकावले होते.

## विराटच्या पोस्टने उडवली खळबळ

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये भारतासाठी विराट कोहली कायमचे एक महत्त्वाचा खेळाडू समजला जातो. या सामन्यासाठी भारतीय खेळाडू जोरदार तयारी करत आहेत. अशातच विराटची एक सोशल मीडिया पोस्ट चाहत्यांमध्ये चांगलीच व्हायरल होत आहे.

विराट कोहलीने एक्सवर व्हाईट ब्रॅकग्राऊंड आणि त्यावर साधा फॉन्टमध्ये मोठी माहिती असलेली एक पोस्ट केली. सहसा अशा पोस्ट महत्त्वाची घोषणा करण्यासाठी केल्या जातात. विराट कोहलीची ही पोस्ट अगदी शेवटच्या ओळींमध्ये नेमकी काय आहे याचा उलगडा होता. तोपर्यंत विराट कोहलीची ही पोस्ट निवृत्तीची असल्याची भिती चाहत्यांच्या मनात दाटून आली, पण विराटने त्याच्या ब्रँडचा प्रचार करण्यासाठी ही पोस्ट केल्याचे समजल्यावर चाहत्यांना हायसे वाटले.

## जसप्रीत बुमराह जन्मजात लीडर-मॉर्केल

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारतीय कसोटी संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे, तिथे त्यांना बॉर्डर-गावसकर ट्रॉफी अंतर्गत पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या मालिकेतील पहिला सामना २२ नोव्हेंबरपासून पर्थ येथे होणार आहे. या पार्श्वभूमीवर भारताचा गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल याने पत्रकार परिषदेत चर्चांना पूर्णविराम देत जसप्रीत बुमराह हा जन्मजात लीडर आहे, तो संघाचे संयमाने नेतृत्व करू शकतो, असे सूचक विधान केले.

भारतीय संघ पर्थ कसोटीत कर्णधार रोहित शर्मा, शुभमन गिल आणि वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीशिवाय मैदानात उतरणार आहे. अशा परिस्थितीत गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल याची कर्णधार म्हणून बुमराहला पसंती आहे. तो म्हणाला. बुमराह हा असा खेळाडू आहे, जो कधीही संकटात



खचत नाही आणि संघाचे नेतृत्व करायला कधीही तयार असतो. त्याने आधीही कर्णधारपद भूषवलं आहे. तो या भूमिकेत यशस्वी राहिलेला आहे. ड्रेसिंग रूममध्ये तो सर्व खेळाडूंशी खूप चांगल्या पद्धतीने संवाद साधतो. संघावर संकट आलं तर तो स्वतः सर्वात पुढे उभा राहून त्या संकटाचा सामना करतो. गोलंदाजीत त्याने ही कमाल अनेकदा दाखवली आहे. मला विश्वास आहे की, युवा पिढी त्याच्याकडून नक्कीच चांगल्या गोष्टी शिकेल, अशा शब्दांत मॉर्ने मॉर्केलने कर्णधारपदाच्या चर्चांना पूर्णविराम दिला.

बुमराहसाठी ऑस्ट्रेलियात नेतृत्व करणे हे चांगले आव्हान ठरेल. भारताच्या संघात विराट कोहली, केएल राहुल यांच्यासारखे कर्णधारपदाचा अनुभव असलेले खेळाडू आहेत. त्यांच्या नेतृत्वाचा अनुभव बुमराहला नक्कीच मदतीचा ठरेल. जेव्हा बुमराह गोलंदाजी करत असतो तेव्हा भारताचा संघ शांत आणि संयमी असतो, कारण तो संघाला कायमच चांगले चित्र दाखवतो. निव्वळ कर्णधापदाबद्दल बोलायचे झाले तर बुमराह हा जन्मजात 'लीडर' आहे, अशा शब्दांत मॉर्कलने बुमराहची स्तुती केली.

**मोहम्मद शमीवरही लक्ष**

आम्ही मोहम्मद शमीच्या आरोग्यावर आणि तंदुरुस्तीवर बारीक लक्ष ठेवून आहोत. आम्हाला त्याच्या आरोग्याचा योग्य अंदाज घ्यावा लागेल. थोडासा संयम बाळगण्याची गरज आहे. आमची वैद्यकीय टीम त्याला योग्य ते मार्गदर्शन करत आहे, असे मॉर्कल म्हणाला.

## मैदानात उतरण्याआधी बुमराहची 'बोलंदाजी'

**पर्थ : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर ट्रॉफी स्पर्धेतील पर्थ कसोटी सामन्यात जसप्रीत बुमराह टीम इंडियाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. पर्थच्या मैदानात उतरण्याआधी कार्यवाहू कर्णधार बुमराहने पत्रकारांसमोर 'बोलंदाजी' केली. नियमित कर्णधार रोहितच्या अनुपस्थितीत गोलंदाजीशिवाय सर्वोत्तम नेतृत्व करून दाखवण्याचे चॅलेंज बुमराहसमोर आहे. याआधी पत्रकार परिषदेत संवाद साधताना त्याने पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.

या वेळी एक सीन असा घडला ज्या वेळी आपल्या 'बोलंदाजी'त बुमराहने रिपोर्टरलाच खतरनाक

### पत्रकार परिषदेत दाखवली चुणूक





यॉर्कर मारल्याचे पाहायला मिळाले. नेमके काय झालं? जसप्रीत बुमराह पत्रकाराला काय म्हणाला? त्या संदर्भातील सविस्तर माहिती.

सध्याच्या घडीला जसप्रीत बुमराह क्रिकेट जगतातील सर्वोत्तम गोलंदाज आहे. तो आपल्या परफेक्ट यॉर्कर लेंथ चेंडूसह गतीने प्रतिस्पर्धी संघातील फलंदाजांना चकवा देण्यात माहीर आहे, पण पर्थ सामन्याआधी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत एका पत्रकराने बुमराहला कॅप्टन्सीसंदर्भातील प्रश्न विचारताना मध्यम जलगती गोलंदाज असा उल्लेख केला. ही गोष्ट बुमराहला चांगलीच खटकली. त्यावर त्याने हसत हसत कडक रिप्लायही दिल्याचे पहायला मिळाले.

रोहित शर्माच्या अनुपस्थितीत भारतीय संघाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज असलेल्या बुमराहला एका पत्रकाराने प्रश्न विचारताना म्हटले की, एक मध्यम जलगती गोलंदाजाच्या रूपात कॅप्टन्सी मिळाल्यावर कसे वाटते? यावर बुमराहने आपण किती वेगाने चेंडू टाकतो हे सांगत संबंधित पत्रकाराची शाळा घेतली. यार मी ताशी १५० किलोमीटर वेगाने चेंडू टाकतो. त्यामुळे तू मला जलदगती गोलंदाज असे म्हणू शकतो, असा रिप्लाय दिला, जो बुमराहच्या यॉर्कर लेंथ चेंडू इतकाच कडक होतो.

**ऑस्ट्रेलियाला दिली वॉर्निंग**

भारतीय संघ जोमाने मैदानात उतरेल, असा इशाराच जसप्रीत पर्थ कसोटी आधी दिला आहे. तो म्हणाला की, आम्ही ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर लवकर पोहचून उत्तम तयारी केली आहे. याआधी आम्ही सरावासाठी कमी वेळ मिळाल्यानंतरही जिंकलो आहे. या वेळी अधिक वेळ मिळाल्यामुळे त्यापेक्षा चांगली कामगिरी करू, असे बुमराहने म्हटले आहे.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com